POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२९३ ● मुंबई, रविवार, २५ मे २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## भारतात वाढत आहेत कोविड केसेस

### स्वतःचे रक्षण करण्यासाठी 'या' गोष्टी ठेवा लक्षात

**■मुंबई । प्रतिनिधी :**

कोरोना विषाणूच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेने सर्वांना हादरवून टाकले होते. २०२० मध्ये पहिल्यांदाच त्याची प्रकरणे समोर येऊ लागली आणि त्यानंतर अनेक नवीन व्हेरिएंट समोर आले. त्यानंतर सर्वांना कोविड लसीकरण देखील दिले गेलेत, परंतु ५ वर्षांनंतरही कोविडची प्रकरणे वारंवार समोर येत आलीत. अशातच आता पुन्हा एकदा भारतातील अनेक राज्यांमध्ये कोविडच्या केसेस समोर आल्या आहेत. यावेळी समोर आलेल्या प्रकरणांमध्ये, कोविड प्रकाराला 'जेएन १' असे नाव देण्यात आले आहे. हा कोविडचा प्रकार जुना असला तरीही आपण सर्वांनी सावधगिरी बाळगणे खूप महत्वाचे आहे. विशेषतः ज्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत आहे किंवा ज्यांना दररोज खूप गर्दी असलेल्या ठिकाणी कामाला जावे लागते अशा लोकांनी काळजी घ्यावी. कोविडच्या धोक्याच्या गांभीर्याबद्दल अद्याप कोणताही इशारा देण्यात आलेला नसला तरी, अलीकडील प्रकरणे पाहता, खबरदारी घेणे महत्वाचे आहे, कारण खोकणे, शिंकणे आणि अगदी हातांनीही हा विषाणू एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीमध्ये पसरतो. तर अशावेळेस आपण सर्वांनी कोणत्या गोष्टी लक्षात ठेवणे महत्वाचे आहे ते आपण आजच्या या लेखात जाणून घेऊयात...




कोविडचे रुग्ण पुन्हा एकदा दिसू लागले आहेत. महाराष्ट्रापासून उत्तर प्रदेश, नोएडापर्यंत अनेक प्रकरणे समोर आली आहेत. यामुळे आपल्या आरोग्याची खबरदारी घेणे खूप महत्वाचे आहे. विशेषतः जर तुम्हाला दररोज बाहेर जावे लागत असेल तर तुम्ही या काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत.

- **बाहेर पडताना ही काळजी घ्या :** तुम्ही जर बाहेर जात असाल तर मास्क नक्कीच वापरा, पण लक्षात ठेवा की तुम्ही दररोज स्वच्छ केलेला मास्कचा वापर करावा आणि त्याला पुन्हा पुन्हा स्पर्श करू नका. लक्षात ठेवा की तुमच्या तोंडासोबतच तुमचे नाक देखील मास्कने व्यवस्थित झाकलेले असले पाहिजे.
- **गर्दीच्या ठिकाणी काळजी घ्या :** तुम्ही बस, ऑटो, मेट्रो किंवा कोणत्याही सार्वजनिक वाहतुकीसारख्या गर्दीच्या ठिकाणाहून प्रवास करत असाल तर अंतर राखण्याचा प्रयत्न करा आणि विशेषतः मास्क घाला. तुमच्या चेहऱ्याला स्पर्श करण्यापूर्वी किंवा काहीही खाण्यापूर्वी तुमचे हात स्वच्छ धुत राहण्यासाठी तुमच्यासोबत एक छोटा सॅनिटायझर ठेवा.
- **सर्दी आणि खोकला झाल्यास घ्यावयाची काळजी :** एखाद्याला सर्दी आणि खोकला असेल तर त्यांच्यापासून अंतर ठेवा आणि जर तुम्हालाही या समस्या असतील तर खोकताना किंवा शिंकताना तुमचे नाक आणि तोंड टिशूने किंवा रूमालाने झाकून घ्या. वापरल्यानंतर ते फेकून द्या. तुमचे हात ताबडतोब स्वच्छ करा.
- **घरी परतताना घ्यावयाची काळजी :** बाहेरून घरी परतल्यानंतर, खुर्ची, पलंग इत्यादी गोष्टींवर जाऊन थेट बसू नका. प्रथम मास्क काढा. जर तो मेडिकल मास्क असेल तर तो ताबडतोब कचऱ्याच्या डब्यात टाका. यानंतर, तुमचे हात, पाय आणि चेहरा स्वच्छ करा, कपडे देखील बदला आणि हात स्वच्छ करा. अशा प्रकारे काही लहान खबरदारी घेतली पाहिजे.
- **आहार योग्य ठेवा :** कोविडपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी, तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत ठेवणे सर्वात महत्वाचे आहे. यासाठी तुमच्या आहारात निरोगी व्हिटॅमिन सी समृद्ध पदार्थांचा समावेश करा. दररोज रात्री झोपण्यापूर्वी तुम्ही कोमट दुधात चिमूटभर हळद पावडर मिक्स करून त्यांचे सेवन करू शकता.



## कोरोनाच्या धोका वाढतोय!

### मुंबईत एकाचा मृत्यू... २४ तासांमधील नव्या रुग्णांची संख्या...

**■मुंबई । प्रतिनिधी :**

सार्वजनिक आरोग्य विभागानं दिलेल्या माहितीनुसार, राज्यात गेल्या २४ तासांत कोरोनाचे ४५ रुग्ण आढळून आले. त्यात मुंबई ३५, पुणे महापालिका ४, रायगड २, कोल्हापूर महापालिका २, ठाणे महापालिका १ आणि लातूर महापालिका १ अशी रुग्णसंख्या आहे. राज्यातील कोरोना रुग्णसंख्येत वाढ सुरू असून, गेल्या २४ तासांत आणखी ४५ रुग्ण आढळले आहेत. राज्यात सर्वाधिक ३५ रुग्ण मुंबईत असून, पुण्यातही ४ जणांना संसर्ग झालेला आहे. या महिन्यात कोरोनाचे एकूण १७७ रुग्ण आढळले आहेत.

मुंबईत एका रुग्णाचा मृत्यू

राज्यात १ जानेवारी ते २३ मेपर्यंत कोरोनाच्या ६ हजार ८१९ संशयित रुग्णांच्या चाचण्या करण्यात आल्या. त्यात २१० रुग्णांना कोरोनाचे निदान झाले. त्यात मुंबईत सर्वाधिक १८३ रुग्णांची नोंद झाली आहे. राज्यातील ८१ कोरोना रुग्ण बरे झाले आहेत. राज्यात कोरोना रुग्णांचा शोध घेण्यासाठी फ्लू आणि श्वसनविकाराच्या रुग्णांचे सर्वेक्षण सुरू आहे. सर्वेक्षणामध्ये आढळलेल्या संशयित रुग्णांची कोरोना चाचणी केली जात आहे. राज्यात कोरोनाचे रुग्ण सध्या तुरळक आढळून येत आहेत. त्यांच्यात सौम्य लक्षणे दिसून येत आहेत. शासकीय रुग्णालयांत कोरोना तपासणी आणि उपचारांची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असे आरोग्य सहसंचालिका डॉ. बबिता कमलापूरकर यांनी सांगितले. मुंबईत एका रुग्णाचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

राज्यात कोरोनामुळे आणखी एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. मुंबईत ७३ वर्षीय रुग्णाचा मृत्यू झाला असून, तो सहव्याधिग्रस्त होता. राज्यात याआधी कोरोनामुळे २ रुग्णांचा मृत्यू झाला होता. त्यातील एका रुग्णास नेफ्रोटिक सिंड्रोम या मूत्रपिंड विकारासह हायपोकॅल्सिमिक सीझर हा चेताविकार होता, तर दुसऱ्या रुग्णास कर्करोग होता. हे दोन्ही रुग्ण सहव्याधिग्रस्त होते, अशी माहिती आरोग्य विभागाने दिली.

दरम्यान, फक्त मुंबईत नाही तर हरियाणा, गुडगाव आणि फरिदाबाद या ठिकाणी देखील कोरोनाचे रुग्ण आढळले आहेत. गुरुगावमध्ये २ रुग्ण आढळले आहेत. तर १ फरिदाबादमध्ये आढळला आहे. तर गुरुगावमध्ये कोरोना पॉझिटिव्ह आलेली महिला ही नुकतीच मुंबईहून परतली होती.

**ठाण्यात कोरोनाचा पहिला बळी... २१ वर्षीय तरुणाचा मृत्यू**

गेल्या काही दिवसांपासून राज्यात कोरोनाग्रस्तांची संख्या वाढत आहे. मुंबई, पुणे, ठाणे यासारख्या शहरांत रुग्णांच्या संख्येत वाढ होताना दिसत आहे. असे असतानाच आता ठाणे जिल्ह्यातून मोठी माहिती समोर येत आहे. येथे अवघ्या २१ वर्षीय तरुणाचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे. या मृत्यूनंतर आता सर्वांनी योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसा ठाण्यात २१ वर्षीय तरुण कोरोनाचा पहिला बळी ठरला आहे. ठाण्यातील कळवा छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात २१ वर्षीय तरुणावर गेल्या काही दिवसांपासून कोरोनावर उपचार चालू होते. मात्र उपचारादरम्यान त्याने याच रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. हा तरुण मुंब्रा येथील रहिवासी आहे. सकाळी ६ वाजेच्या सुमारास त्याच दुर्दैवी मृत्यू झाला आहे. त्याला २२ मे रोजी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचार चालू असताना त्याची कोरोना चाचणी करण्यात आली होती. या चाचणीचा अहवाल काल समोर आला होता. त्याची ही कोरोना चाचणी पॉझिटिव्ह आली होती. त्यानंतर त्याचा शनिवारी सकाळी ६ वाजता उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

## नीती आयोगाच्या बैठकीतील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या भाषणातील महत्त्वाचे मुद्दे



**■मुंबई । प्रतिनिधी :**

नुकतीच नीती आयोगाची महत्त्वाची बैठक पार पडली, या बैठकीमध्ये भाषण करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात सध्या सुरू असलेल्या विविध योजनांबाबत आणि भविष्यात राबवण्यात येणाऱ्या योजनांसंदर्भात माहिती दिली.

**फडणवीस यांच्या भाषणातील ठळक मुद्दे :**

- भारतीय सैन्य दल आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचे 'ऑपरेशन सिंदूर' बद्दल हृदयपूर्वक आभार आणि अभिनंदन. मोदीजींच्या दहशतवादाविरोधात झिरो टॉलरन्सचा संकल्प यातून अधोरेखित होतो.
- राष्ट्रीय धोरणानुसार, महाराष्ट्र सरकार सुद्धा महाराष्ट्र २०४७ असे व्हीजन तीन टप्प्यात तयार करीत आहे. १०० दिवसांच्या सुशासन, नागरिक केंद्रीत उपाययोजना आणि उत्तरदायित्व अशा सूत्रावर एक कार्यक्रम आमच्या सरकारने हाती घेतला. यात विविध विभागांनी ७०० हून अधिक उद्दिष्ट साध्य केले.
- आता दीडशे दिवसांचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. यात २०४७ साठी दीर्घकालीन, महाराष्ट्र आपला अमृत महोत्सव साजरा करेल, त्या कालावधीचे म्हणजे २०३५ साठी आणि प्रतिवर्षाच्या उद्दिष्टांसह २०२९ साठीचे अल्पकालिक ५ वर्षांचे असे व्हीजन तयार करण्यात येत आहे.
- विद्यमान अर्थव्यवस्था २०३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलर्स आणि २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर्सची करणे, हा आमचा मुख्य उद्देश आहे. नवीन उद्योग धोरणाचा उद्देश जीडीपीत उत्पादन क्षेत्राचे योगदान २० टक्क्यांच्या वर आणणे हा आहे. मैत्री २.० ही सिंगल विंडो क्लिअरन्स प्रणाली कार्यान्वित करण्यात आली असून, ईव्ही, सेमिकंडक्टर, ग्रीन हायड्रोजन, डेटा सेंटर्स यासारख्या नवक्षेत्रांना प्रोत्साहित करण्यात येत आहे.
- २०२४-२५ या पहिल्या तिमाहीत देशात सर्वाधिक १.३९ लाख कोटींची परकीय गुंतवणूक आकर्षित केली आहे. दावोस वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये १५.९६ लाख कोटींचे सामंजस्य करार केले. त्यातील ५० टक्के प्रस्तावांवर प्रक्रिया सुरु झाली असून, त्यातील अधिकाधिक गुंतवणूक ही दुसऱ्या आणि तिर्सया श्रेणीतील शहरांमध्ये होत आहे.
- विकासाला गती देण्यासाठी पायाभूत सुविधा, विविध सुधारणा आणि रोजगार वाढविण्यावर आमचा भर आहे. समृद्धी महामार्ग, अटलसेतू, कोस्टर रोड आदी प्रकल्प महाराष्ट्राच्या विकासाला आणि पायाभूत क्षेत्रातील क्रांतीला गती देत आहेत. वाढवण पोर्ट, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मेट्रो, रेल्वे, मल्टीमॉडेल लॉजिस्टिक पार्क हे क्षेत्रीय विकासाला चालना देणार असून, त्यासाठी आम्ही पंतप्रधान महोदयांचे आभारी आहोत, असं यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी म्हटलं.

दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी देशाचे नवे सरन्यायाधीश भूषण गवई यांची देखील भेट घेतली. त्यांना विधानमंडळात सर्वपक्षीय सत्कार तसेच, भारतीय संविधान याविषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानासाठी वेळ देण्याची विनंती यावेळी मुख्यमंत्र्यांनी केली.

## केंद्रीय गृहमंत्रालयाच्या आदेशावरून थेट पुण्यात मोठी कारवाई... कॉल सेंटरमध्ये काय सुरू होतं?

**■पुणे । प्रतिनिधी :**

केंद्र सरकारने चुकीच्या गोष्टींना आळा घालण्यासाठी कठोर पावलं उचलली आहेत. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर तर केंद्र सरकारने अशा चुकीच्या घडामोडींवर अधिक लक्ष केंद्रीत केलं आहे. आज पुणे येथील खराडी परिसरात तर पोलिसांनी एक कॉल सेंटरवर छापा मारला. विशेष म्हणजे केंद्रीय गृहमंत्रालयाच्या आदेशानंतर ही कारवाई करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली आहे. या कॉल सेंटरमध्ये असे काय चालत होतं की ज्यासाठी केंद्राला दखल घ्यावी लागली? असा सवाल या निमित्ताने केला जात आहे.

पुण्यातील खराडी परिसरात प्राइड आयकॉन नावची इमारत आहे. या इमारतीमध्ये ९ व्या मजल्यावर बनावट कॉल सेंटरवर सुरू होतं. पुणे पोलिसांनी आज या कॉल सेंटरवर अचानक धाड मारली आणि १२३ जणांवर गुन्हा दाखल केला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरूनच केंद्रीय गृहमंत्रालयाला या सेंटरची तक्रार आली होती. त्यामुळे केंद्रीय गृहमंत्रालयाने पुणे पोलिसांना या सेंटरवर कारवाई करण्याचे आदेश देताच पुणे पोलिसांनी धाड धाड छापे मारत १२३ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. पुण्यातील ही सर्वात मोठी कारवाई असल्याचं सांगितलं जात आहे.

**केंद्रकडे तक्रार येताच...**

केंद्रीय गृहमंत्रालयाने पुणे पोलिसांना या कॉल सेंटरची माहिती देऊन कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानंतर पुणे सायबर पोलीस, गुन्हे शाखा आणि स्थानिक पोलिसांनी मिळून ही मोठी कारवाई केली. बनावट कॉल सेंटर प्रकरणी पाच आरोपींना अटक करण्यात आलीय आहे. तर २ जण फरार आहेत. या कॉल सेंटरमध्ये काम करणाऱ्या १२३ पेक्षा अधिक कर्मचाऱ्यांची कसून चौकशी सुरू आहे. बनावट कॉल सेंटरमध्ये जे मोबाईल, लॅपटॉप ब्लॅकमेलिंगसाठी आणि फसवणूक करण्यासाठी वापरले जायचे ते पोलिसांनी जप्त केले आहेत. एकूण ४१ मोबाईल आणि ६२ लॅपटॉप पोलिसांकडून जप्त करण्यात आले आहेत.

**तीन महिन्यापासून काम सुरू**

या संपूर्ण प्रकरणात करण शेखावत हा मुख्य आरोपी आहेत. त्याच्या या कॉल सेंटरमध्ये १२३ लोक काम करत होते. गेल्या तीन महिन्यांपासून या ठिकाणी काम सुरू होते, अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली. या प्रकरणी पोलीस आता गुन्हा दाखल करत आहेत. आरोपींची कसून चौकशी करण्यात येणार आहे. या लोकांचे कॉल सेंटर आणखी किती ठिकाणी होते? त्यांनी कुणा कुणाला शिकार बनवलं होतं? तसेच या आरोपींचे कुणाशी लागेबांधे आहेत का? याचाही तपास केला जाणार असल्याचं सांगितलं जात आहे.

**डीजिटल अरेस्टचा खेळ**

या बनावट कॉल सेंटर प्रकरणी अटक करण्यात आलेले आरोपी गुजरातचे असल्याची माहिती आहे. महाराष्ट्रातील काही लोकही यामध्ये सहभागी असल्याचे समजतंय. परदेशातील नागरिकांना या प्रकरणात टार्गेट केलं जायचं आणि डिजिटल अरेस्टची भीती दाखवून फसवणूक केली जायची, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे. परदेशातील नागरिकांना डीजिटल अरेस्ट करण्यासाठीच हे बोगस कॉल सेंटर उघडण्यात आलं होतं, असं सूत्रांनी सांगितलं.




## अघोरी प्रकार की लैंगिक अत्याचार?

### सोलापूरात पुरलेल्या अवस्थेत आढळला मुलीचा मृतदेह

**■सोलापुर । प्रतिनिधी :**

दक्षिण सोलापूर जिल्ह्यात एक हादरवणारा प्रकार समोर आला आहे. ९ वर्षीय चिमुकलीचा मृतदेह पुरलेल्या अवस्थेत सापडला आहे. या प्रकारामुळं एकच खळबळ उडाली आहे. मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट असून आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुसुर गावातील ही धक्कादायक घटना आहे. मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट असून पोलिसांनी आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मात्र पोलिस पाटलांच्या प्रथम जबाबानुसार खून झालेल्या मुलीच्या वडिलांनीच मुलीचा खून केल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. तशी फिर्याददेखील पोलिस पाटलांनी दिल्याचे समोर येत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणी नातेवाईकांची कसून चौकशी करण्यात आली असून मृतदेह पोस्टमार्टमसाठी रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. शवविच्छेदव अहवाल आल्यानंतरच आरोपी निश्चित करण्यात येईल, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप पोलिस स्टेशनमध्ये अकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मात्र या चिमुकलीचा मृत्यू अघोरी प्रकारातून की लैंगिक अत्याचारातून झालाय याची माहिती शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच स्पष्ट होणार आहे. मात्र शाळकरी मुलीचा अशाप्रकारे मृतदेह सापडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.



## '१०२ क्रमांकाची खोली, १५ कोटींच्या कॅशचं 'टार्गेट' अन्...'

### 'चोरांना चोरांचेच संरक्षण' म्हणत ठाकरेंच्या शिवसेनेचा सीएमवर निशाणा



**■धुळे । प्रतिनिधी :**

धुळ्याच्या शासकीय विश्रामगृहातील बंद खोलीमध्ये कोट्यवधी रुपयांची रोकड सापडल्याच्या मुद्द्यावरुन उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेनं सत्ताधाऱ्यांबरोबरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर निशाणा साधला आहे. 'सामना'मध्ये 'भ्रष्टाचाराचा नवा 'अंदाज', चोरांना चोरांचे संरक्षण' या मथळ्याखालील अग्रलेखामधून ठाकरेंच्या शिवसेनेनं धुळे प्रकरणावरुन सरकारला लक्ष्य केलं आहे.

**विधिमंडळाच्या इभ्रतीस कलंक लावणारा प्रकार**

''देवेंद्र फडणवीस यांच्या राजवटीत भ्रष्टाचार आणि खाऊबाजीस मोकळे रान मिळाले आहे. हा मोकाटपणा लोकशाहीचे मंदिर वगैरे मानल्या गेलेल्या विधिमंडळाच्या वैधानिक समित्यांपर्यंत पोहोचला ही चिंतेची बाब आहे. धुळ्याच्या शासकीय विश्रामगृहातील एका बंद खोलीत (क्र. 102) कोट्यवधींची रोकड सापडली. या रोकडीचा संबंध थेट विधिमंडळाच्या अंदाज समितीशी लावण्यात आला असून धुळे जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेल्या अंदाज समितीच्या अध्यक्षांना नजराणा म्हणून देण्यासाठीच ही भव्य रोकड जमा करण्यात येत होती, असे उघडपणे बोलले जात आहे. शिवसेनेचे माजी आमदार अनिल गोटे यांना या व्यवहाराची खबर लागताच शिवसैनिकांना घेऊन गोटे विश्रामगृहावर पोहोचले. गोटे आल्याची खबर लागताच अंदाज समिती अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक किशोर पाटील यांनी खोलीस टाळे लावून पलायन केले. जाताना काही रोकड ते सोबत घेऊन गेले. गोटे व शिवसैनिक त्या खोलीसमोर आंदोलनास बसले तेव्हा प्रशासन तेथे पोहोचले. खोली उघडली तेव्हा कोट्यवधींची गुहाच समोर आली. हा सर्वच प्रकार धक्कादायक आणि विधिमंडळाच्या इभ्रतीस कलंक लावणारा आहे,'' असं ठाकरेंच्या शिवसेनेनं म्हटलं आहे.

**'अंदाज' समितीच वाद, संशयाच्या गर्तेत**

''विश्रामगृहाच्या १०२ नंबरच्या खोलीत पैशांची बंडले होती व त्याची मोजदाद करण्यासाठी पैसे मोजणाऱ्या मशीन मागवाव्या लागल्या. राज्यात भ्रष्टाचार किती वेगाने प्रगती करीत आहे त्याचे हे उदाहरण. शिंदे गटाचे अर्जुन खोतकर हे अंदाज समितीचे अध्यक्ष आहेत व खोतकरांचे पी.ए. किशोर पाटील यांच्या खोलीत कोट्यवधी रुपये धुळ्यातले ठेकेदार जमा करीत होते ते कशासाठी? मागील काही काळापासून अंदाज समितीचे अध्यक्षपद खोतकरांकडे आहे आणि किशोर पाटील त्यांच्यासाठी माया गोळा करतात असे आरोप पूर्वीपासून होत आहेत. धुळ्यातील शासकीय विभागांच्या कामाचा आढावा घेण्यासाठी खोतकर यांच्या नेतृत्वाखाली अंदाज समिती धुळ्यात अवतरली आहे. जिल्ह्यातील शासकीय कामे, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, रस्ते वगैरे विभागांतर्फे झालेल्या कामांचा आढावा घेणे, झालेला खर्च व प्रत्यक्ष झालेले काम यांचा मेळ बसतोय का याची झाडाझडती घेणे व काही त्रुटी किंवा अफरातफर आढळली तर तसा अहवाल करून सरकारला देणे, हे असे अंदाज समितीचे काम असते. अंदाज समिती ही एक प्रकारची आर्थिक समिती आहे. बजेटमध्ये नमूद केलेल्या धोरणाच्या चौकटीत पैशांचा विनियोग, हिशोब वगैरे झाले आहेत काय, हे तपासण्यासाठी समिती जिल्हावार फिरून बैठका घेत असते. सार्वजनिक उपक्रमात आर्थिक बेशिस्त झाली आहे काय? हे तपासण्याचे काम समितीला करावे लागते. म्हणजे चोऱ्या पकडण्याची जबाबदारी या समितीवर आहे, पण आता ही 'अंदाज' समितीच वादाच्या आणि संशयाच्या गर्तेत सापडली,'' असं अग्रलेखात म्हटलं आहे.

**...तर महाराष्ट्रातील भ्रष्टाचाराचे खरे रूप बाहेर येईल**

''ठेकेदार व अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट हातमिळवणीतून सरकारी खर्च होतात, पण कागदावर प्रत्यक्षात कामे होत नाहीत हे पहिले व कामे झालीच तर अत्यंत खालच्या दर्जाची केली जातात व ठेकेदार नफा वाढवून त्यातला वाटा अधिकारी आणि संबंधित मंत्र्यांना देतात, हे दुसरे. अशी ही कोट्यवधीची लूटमार चालते. ती रोखण्यासाठी विधिमंडळाची अंदाज समिती आहे, पण तेथे कुंपणच शेत खात आहे. सरकारी कामात केलेल्या चोऱ्या अंदाज समितीने दाबाव्यात म्हणून धुळ्यातले ठेकेदार एकत्र आले व त्यांनी 'वर्गणी' रूपाने कोट्यवधी रुपये १०२ क्रमांकाच्या खोलीत जमा केले. या खोलीचा थेट संबंध अंदाज समितीचे अध्यक्ष खोतकरांशी आहे. या सगळ्याची चौकशी झाली तर महाराष्ट्रातील भ्रष्टाचाराचे खरे रूप बाहेर येईल,'' असं ठाकरेंच्या शिवसेनेनं म्हटलं आहे.

**हे सरळ सरळ मनी लॉण्डरिंग**

''१०२ क्रमांकाच्या खोलीत १५ कोटी रुपये जमा करण्याचे 'टार्गेट' होते. त्यातले पाच-साडेपाच कोटी दोन दिवसांत जमा झाले. उरलेली रक्कम जालन्यात जमा करा, असे ठेकेदारांना सांगण्यात आले. हे सरळ सरळ मनी लॉण्डरिंग आहे व ते महाराष्ट्र विधिमंडळाच्या अंदाज समितीनेच केले काय? हा तपासाचा विषय आहे. खोतकर हे पूर्वी शिवसैनिक होते. 'ईडी'च्या कारवाईला घाबरून ते उंदराप्रमाणे शिंदे यांच्या गोटात गेले. साखर कारखान्याच्या खरेदीतला गैरव्यवहार 'ईडी'ने समोर आणला व खोतकरांना चौकशीला बोलावताच अजुर्नाची गाळण उडाली. आता तर त्यांच्या नेतृत्वाखालील विधिमंडळाच्या अंदाज समितीवरच भ्रष्टाचाराचे आरोप झाले व ज्यांच्यावर झाले ते खोतकर हे एकनाथ शिंद्यांचे हस्तक आहेत यातच सर्व आले,'' असा टोला ठाकरेंच्या शिवसेनेनं लगावला आहे.

**चोरांना चोरांचेच संरक्षण**

''भाजप राज्यात हायकोर्ट जज यशवंत वर्मांच्या घरात १५ कोटी सापडतात व धुळ्याच्या विश्रामगृहात अंदाज समितीच्या नावाने कोट्यवधींचा नजराणा जमा होतो. आता अर्जुन खोतकर म्हणतात, 'तो मी नव्हेच!' परंतु यांच्यावर कोण विश्वास ठेवणार? विश्वास ठेवावा असा यांचा पूर्वेतिहास नाही. गृहमंत्री फडणवीस व त्यांचे लाचलुचपत प्रतिबंधक खाते या प्रकरणात काय करणार? त्यांनी आता एका 'एसआयटी'ची घोषणा केली. ही फक्त धूळफेक आहे. चोरांना चोरांचेच संरक्षण आहे, दुसरे काय म्हणायचे?'' असा सवाल लेखाच्या शेवटी विचारण्यात आला आहे.



# संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## 'ईडी'चे सूडचक्र

**तमिळनाडूतील मद्य परवाना गैरव्यवहार प्रकरणात 'ईडी'ने राज्य पणन महामंडळावरच केलेल्या कारवाईबाबत न्या. गवई आणि न्या. ऑगस्टिन जॉर्ज मसिह यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. 'ईडी' सर्व सीमा ओलांडत असून, संघराज्य संकल्पनेचेही उल्लंघन करीत आहे,ह्व अशा शब्दांत कानउघाडणी करून खंडपीठाने 'ईडी'च्या कारवाईला स्थगिती दिली.**

सर्वोच्च न्यायालयांसह विविध उच्च न्यायालयांनी समज दिल्यानंतरही सक्तवसुली संचालनालयाचा (ईडी) अगोचरपणा थांबण्यास तयार नाही, हेच सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या खंडपीठाने 'ईडी'वर ओढलेल्या ताशेऱ्यांमधून दिसून येत आहे. तमिळनाडूतील मद्य परवाना गैरव्यवहार प्रकरणात 'ईडी'ने राज्य पणन महामंडळावरच केलेल्या कारवाईबाबत न्या. गवई आणि न्या. ऑगस्टिन जॉर्ज मसिह यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. 'ईडी' सर्व सीमा ओलांडत असून, संघराज्य संकल्पनेचेही उल्लंघन करीत आहे,' अशा शब्दांत कानउघाडणी करून खंडपीठाने 'ईडी'च्या कारवाईला स्थगिती दिली. एखाद्या प्रकरणात कारवाई करत असलेल्या यंत्रणेलाच लक्ष्य करण्याच्या प्रयत्नांना यामुळे शह बसला आहे. गेली दहा वर्षे हे प्रकरण तमिळनाडूमध्ये गाजत आहे. तेथील राज्य पणन महामंडळामार्फत राज्यातील मद्याच्या घाऊक व किरकोळ विक्री व्यवहारांचे नियंत्रण केले जाते. या संदर्भातील विविध व्यवहार आणि निविदा प्रक्रियेत सुमारे एक हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचा आरोप आहे. त्यामध्ये मद्य परवान्यांसाठी बनावट कागदपत्रे सादर करणे, वाहतूक टेंडरमध्ये कागदपत्रांची फेरफार करून ठरावीक व्यक्तींनाच फायदा मिळवून देणे, खरेदीच्या बनावट नोंदी आणि बनावट (शेल) कंपन्यांची स्थापना, यांबरोबरच मोठ्या प्रमाणात लाचखोरी झाली असून, त्यात राजकारणी व नोकरशहांचाही समावेश असल्याचे आरोप करण्यात येतात. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर राज्य सरकारने महामंडळामार्फत फौजदारी कारवाई सुरू केली आणि सुमारे ४१ गुन्हे दाखल करण्यात आले होते. ही कारवाई सुरू असतानाच 'ईडी' ने या प्रकरणात हस्तक्षेप करून दोन महिन्यांपूर्वी तमिळनाडूत महामंडळाच्या मुख्यालयासह विविध अधिकारी आणि मद्य व्यावसायिकांवर छापे घातले. राज्य सरकारकडून कारवाई सुरू असताना केंद्राच्या अखत्यारीतील 'ईडी'ने शिरकाव करून कारवाई करणाऱ्या महामंडळावरच 'मनी लाँडरिंग' कायद्यानुसार कारवाईचा बडगा उगारण्यास राज्य सरकार आणि महामंडळाने आक्षेप घेतला होता. आता सर्वोच्च न्यायालयाने कडक ताशेरे ओढून या कारवाईला स्थगिती दिल्याने 'ईडी' पुन्हा आरोपांच्या भोवऱ्यात अडकली आहे. पुढील वर्षीच्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणावरून तेथे राजकारण पेटल्यास नवल नाही. भारतीय जनता पक्षाचे तेथील प्रमुख नेते के. अण्णामलाई यांनी तेथील उत्पादन शुल्कमंत्री व्ही. सेंतिल बालाजी हेच या गैरव्यवहाराचे सूत्रधार असल्याचा आरोप केला असून, राज्य सरकारने पुरावे नष्ट करू नयेत, म्हणून 'ईडी'ची कारवाई व्हावी, अशी मागणी केली होती. आता या प्रकरणी राज्य सरकारला बदनाम करण्याचा भाजपचा प्रयत्न फसल्याचा आरोप सत्ताधारी द्रविड मुन्नेत्र कळघमने केला आहे. काही दिवसांपूर्वीच तमिळनाडूत विधेयके अडवणाऱ्या राज्यपालांनाही सर्वोच्च न्यायालयाने फटकारले होते. बिगर भाजपशासित राज्ये आणि केंद्र सरकारच्या संबंधांमध्ये गेल्या काही वर्षांत कमालीचा कडवटपणा निर्माण झाला आहे. त्याबरोबरच विरोधी पक्षांच्या नेत्यांवरच 'ईडी'कडून 'पीएमएलए'चा गैरवापर करण्यात येत असल्याचा आरोप पूर्वीपासून आहे. संसदेत दिलेल्या माहितीनुसार, सन २०१९ ते २४ या काळात 'मनी लाँडरिंग'च्या ९११ तक्रारी करण्यात आल्या. त्यापैकी ६५४ खटल्यांचा निकाल लागला असून फक्त ४२, म्हणजे फक्त ६.४२ टक्के प्रकरणांमध्ये दोषसिद्धी झाली आहे. दोषसिद्धीच्या या अत्यल्प प्रमाणामुळे या कारवायांमागे विरोधकांची बदनामी आणि राजकीय 'ब्लॅकमेलिंग'च्या आरोपांना बळ मिळते. गुन्हेगारांना शिक्षा झालीच पाहिजे; मात्र वर्षानुवर्षे हे गुन्हे सिद्ध होत नाहीत आणि गुन्हे दाखल असलेली मंडळी मंत्रीपदे मिळवून सत्ताधाऱ्यांच्या मांडीला मांडी लावून बसतात, यातून जनतेने काय अर्थ काढावा? अन्य एका माहितीनुसार, १९३ राजकीय नेत्यांवर कारवाई करण्यात आली आणि त्यापैकी केवळ दोन प्रकरणांत दोषसिद्धी झाली आहे. 'पीएमएलए' कायद्यातील कठोर तरतुदी लागू करण्यासाठी पुढाकार घेणारे पी. चिदंबरम, राहुल गांधी, सोनिया गांधी, अरविंद केजरीवाल अशा अनेकांवर त्याच कायद्यानुसार कारवाई झाली, मात्र कोणावरही अद्याप आरोप सिद्ध न झाल्याने 'प्रक्रिया हीच शिक्षा' असे म्हणावे लागते. इतका कडक कायदा असूनही दोषसिद्धी का होत नसावी? विरोधकांच्या मागे 'ईडी'चा तगादा लावण्यामागील सूडचक्राचे राजकारण यातून ठळकपणे समोर येते.

# वैष्णवी गेली... पण काळ सोकावता नये



**वैष्णवी हगवणे हिच्या मृत्यूमुळे महाराष्ट्रात संतापाची लाट आहे. वैष्णवीने शशांक हगवणे याच्याबरोबर प्रेमविवाह केला होता. तरीही हुंड्यासाठी तिचा अनन्वित छळ झाला आणि अंतिमतः तिचा मृत्यू झाला. तिच्या मृत्यूची नोंद आत्महत्या अशी करण्यात आली आहे. माहेरच्या लोकांचे म्हणणे आहे की, हा खून आहे. यानिमित्ताने अनेक प्रश्न उपस्थित होतात.**

महाराष्ट्रासह देशात हुंडाबंदीचा कायदा आहे. हुंडाबंदी कायद्यात केलेली हुंड्याची व्याख्या असे सांगते की, मुलीला तिच्या लग्नात तिच्यासोबत दिलेल्या रोख रकमेसह सर्व चीजवस्तू म्हणजे हुंडा. ज्यामध्ये कपडे, दागदागिने, स्थावर जंगम मालमत्ता, गाडी, फ्लॅट या सर्वांचा समावेश होतो. असा कायदा लोकप्रतिनिधींनी सभागृहात पारित केल्यानंतर जाहीर कार्यक्रमात, म्हणजेच लग्नसमारंभात जाऊन, उपमुख्यमंत्र्यांनी वैष्णवीच्या वडिलांनी त्यांच्या पैशातून विकत घेतलेल्या फॉर्च्युनर गाडीची चावी लग्नसमारंभात जाहीरपणे वैष्णवीच्या पतीला दिल्याचा फोटो आहे. हे हुंडाबंदी कायद्याचे उल्लंघन नाही का? हुंडाबंदी कायद्यांतर्गत या सर्वांवर हुंडाबंदी कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल गुन्हा दाखल व्हायला हवा.

अशी जाहीर मोठी लग्नं करून कोणत्याही मार्गाने मिळविलेल्या पैशाचे हिडीस, ओंगळवाणे प्रदर्शन करणाऱ्या अगदी अंबानीपासून ते या राजकारण्यांपर्यंत, लग्नसमारंभात तथाकथित प्रतिष्ठा मिरविणाऱ्या वृत्तीला वेळीच पायबंद घातला गेला पाहिजे. देशातील एकेकाळचे अर्थमंत्री प्राध्यापक मधु दंडवते यांनी लग्नात होणाऱ्या खर्चावर कर लावण्यात यावा, असे म्हटले होते. आताच्या भाषेत सांगायचे झाल्यास, या सर्वांवर जीएसटी लावल्यास राज्याच्या तिजोरीत भर पडेल. ज्यावेळी महिला आयोग गठित करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्याने घेतला, तेव्हा समाजमाध्यम नव्हते, तरीही त्यावेळी पन्नास हजारहून अधिक सूचना आल्या होत्या. मग महिला आयोग अस्तित्वात आला. महिला आयोग हा राजकीय पक्षांशिवाय निपक्षपातीपणाने काम करणारा आयोग असला पाहिजे. परंतु तसे दिसत नाही. त्यामुळेच स्त्री प्रश्नांविषयी बांधिलकी असणाऱ्या महिला आयोगात गेल्या, आयोगात पदाधिकारी झाल्या, तरी त्या निर्भयपणे स्त्रियांच्या हिताच्या बाजूने भूमिका घेत नाहीत; तर राजकारणातील, आपल्याला त्या पदावर बसवणाऱ्या गॉडफादरची आणि त्याच्या पक्षाची राजकीय काही अडचण तर होणार नाही ना, याची काळजी त्या अधिक घेतात. म्हणून यापूर्वीच सुचवलं होतं, त्याप्रमाणे बचत गट, महिला मंडळ, निवडून आलेल्या महिला सदस्य, महिला संस्था, महिला संघटना यांनी लोकशाही मार्गाने गुणवत्ता नोंदवून महिला आयोगावर प्रतिनिधित्व पाठवावं. हे प्रतिनिधित्व महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थितीचे, विविध जातीधर्मांचे, वर्गाचे प्रतिनिधित्व करणारे असले पाहिजे. पुरुषी राजकीय पक्षांनी अस्तित्वात आणलेला महिला आयोग हा सत्ताधारी राजकीय पक्षांची सोय म्हणून काम करतो.

वैष्णवीसारख्या शिकलेल्या, सवरलेल्या, श्रीमंत घरातील मुली आणि त्यांचे पालक हे बेगडी, खोट्या पारंपरिक प्रतिष्ठेच्या व्यवस्थेला बळी पडताना दिसतात. ही अधिक चिंतेची बाब आहे. लग्न झालेली मुलगी या ना त्या कारणाने पुन्हा माहेरी आल्याने आपली अप्रतिष्ठा होते, असेच मुलींना आणि त्यांच्या पालकांना वाटते, हे थांबविले पाहिजे. पुन्हा नव्याने पुनर्विवाह करण्याचा, स्वप्न पाहण्याचा तिचा अधिकार मुलांप्रमाणेच आपण मान्य का करत नाही?

पारंपरिक कुटुंबांमध्ये मुलींच्या, महिलांच्या सोबत कुटुंबात, सासर घरी, माहेर घरी हिंसा झाल्यास, छेडछाड झाली, विनयभंग झाला, बलात्कार झाला, मानसिक छळ झाला, बौद्धिक, आर्थिक कोंडी झाली तर मुलींच्या नातेवाईकांना दुःख जरूर होते. परंतु त्या संदर्भात पोलीस ठाण्यात जाऊन अगर कोर्टात जाऊन तिने गुन्हा दाखल करून कायद्याचा आधार घेतल्यास आणि लढायला उभी राहिल्यास मात्र त्यांची अप्रतिष्ठा होते. नातेवाईक तिच्यासोबत उभे राहत नाहीत. हा पारंपरिक विचार वैष्णवीसारख्या मुलींचे जीव घेतो आहे. चुकीच्या गोष्टीविरुद्ध ठामपणे उभे राहण्याचे, विरोध करण्याचे आणि आत्मविश्वासाने लढण्याचे बळ आम्ही आमच्या मुलींना का देत नाही? अरेला कारे म्हणायला का शिकवत नाही? ''दिली तिथं मेली'' हा विचार आता जुना झाला. ''पावसाने झोडलं आणि नवऱ्याने मारलं तर सांगायचं कुणाला'' या म्हणी आता नाहीशा झाल्या पाहिजेत. मुलींना हिंसेविरुद्ध मुक्तपणे बोलायला आणि विरोध करायला शिकवलं पाहिजे.

उलटपक्षी, सासरच्या अवास्तव हुंड्याच्या मागण्या पुऱ्या केल्या जातात. छळाला कंटाळून विष घेऊन वैष्णवीने जीवन संपविण्याचा प्रयत्न केल्यानंतर पुन्हा तिला सासरी पाठवणारे वैष्णवीच्या माहेरचे लोकही सासरच्या लोकांइतकेच तिचे गुन्हेगार आहेत. त्याच वेळेला कुटुंबामध्ये होणाऱ्या हिंसेविरुद्ध महिलांचे संरक्षण करणाऱ्या कायद्यांतर्गत कोर्टात तक्रार दाखल केली असती, तर वेळीच त्यांना आळा बसला असता. हुंडा घेणे गुन्हा आहेच, पण देणाराही तितकाच दोषी आहे. त्यामुळे काळ सोकावितो आणि वैष्णवीसारख्या मुलींचे जीवन अकाली संपून जाते.

दहा महिन्यांच्या लेकराची आई मरून जाते, वडील जेलमध्ये जातो आणि एका सुंदर घराला, कुटुंबाला, परिवाराला हे लेकरू मुकते. कोणत्याही मार्गाने घरात पैसे आणणाऱ्या या नवश्रीमंत, राजकीय पाठबळ लाभलेल्या, तत्त्वशून्य पक्षांमधील अगदी खालपासून वरपर्यंतच्या पदाधिकाऱ्यांचा लेखाजोखा आता गावनिहाय जनसुनवाया घेऊन आपण मांडला पाहिजे. खासगी कंपन्यांसारखे यांचे हे राजकीय पक्ष आणि त्यांच्या नेत्यांनी मसल पॉवर, मनी पॉवर, मॅन पॉवर बघून निवडलेले सो-कॉल्ड पदाधिकारी यांना आणि त्यांनी आयोजित केलेल्या अशा लग्नसमारंभाला मिळणारी प्रतिष्ठा थांबवली पाहिजे. अशा कार्यक्रमांवर बहिष्कार घातला पाहिजे. समाजमाध्यमांवर त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना मिळणारी प्रसिद्धी आणि प्रतिष्ठा थांबवली पाहिजे. लोकशाहीच्या मार्गाने सक्रिय होऊन अशांना नेते मानणे आपण थांबवले पाहिजे. आता ती वेळ आलेली आहे. त्यांच्या घरातील बायकांबरोबर त्यांचे वागणे, पक्षातील सहकारी महिलांच्या संदर्भातील त्यांच्या कॉमेंट्स आणि त्यांचे वर्तन, सभागृहात आणि सार्वजनिक जीवनात महिलांच्या प्रश्नांवर त्यांच्या भूमिका, त्यांचे वक्तव्य हे सगळे तपासण्याची आणि वेळीच रोखण्याची वेळ आली आहे. अशा तत्त्वशून्य, क्रिमिनल, नवश्रीमंत पदाधिकाऱ्यांना आणि अशा राजकीय पक्षांना राजकीय पक्ष तरी कसे म्हणावे? वैष्णवीच्या जाण्याने महाराष्ट्रातील राजकारणी गुंड आणि प्रशासन यांच्या अभद्र युतीच्या संदर्भामध्ये पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. ही चर्चा केवळ चर्चा न राहता, काहीतरी सकारात्मक बदल या संदर्भामध्ये होणे अपेक्षित आहे आणि म्हणूनच वैष्णवीच्या वडिलांनी वेळोवेळी सासरच्या मागण्या पूर्ण करून दिलेल्या त्या सर्व चीजवस्तू, गाडी, सोनं-नाणं, चांदी हे स्त्रीधन आहे. ते वैष्णवीच्या वडिलांच्या ताब्यात परत दिले पाहिजे. कारण या पद्धतीची चर्चा प्रसिद्धी माध्यमातून मागे पडल्यानंतर, प्रचंड राजकीय पाठबळ असणारे, प्रशासकीय पोहोच असणारे आणि गुंड बाळगून असणारे हे कुटुंब पुन्हा एकदा वैष्णवीच्या माहेरच्यांचा छळ मांडणारच नाही, याची खात्री देता येत नाही. त्यावेळी त्यांच्या पाठीशी जर कोणी उभं राहिलं नाही, तर वैष्णवी जीवानिशी गेलीच, परंतु कस्पटे कुटुंबांचा वैष्णवीच्या स्त्रीधनासाठी झालेला खर्च तरी किमान तिच्या लेकरासाठी परत मिळाला पाहिजे, तशी कायद्यात तरतूद आहे. यासंदर्भामध्ये अगदी लेकरांचा ताबा घेण्यापासून मुलींची कागदपत्रं ताब्यात घेण्यापर्यंत आम्हाला अनेक अडचणी महाराष्ट्रात येत आहेत. ज्या काळात महिला मंडळ सक्रिय होते, तेव्हा प्रत्यक्ष जमिनीवर जाऊन स्थानिक पोलीस पाटलांच्या मदतीने या गोष्टी आणि लेकरांचा कब्जा घेऊ शकत होतो. परंतु आज पोलीस मदत करत नाहीत. कोटार्तून आदेश आणा म्हणतात. कोर्ट तातडीने निर्णय देत नाही आणि पोलिसांकडे बोट दाखवलं जातं. त्यामुळे खूप मोठ्या प्रमाणावर ''भीक नको पण कुत्रा आवर'' असं म्हणण्याची वेळ स्त्रियांवर येते आहे. प्रसिद्धी माध्यमांनी हे प्रकरण उचलून धरलं नसतं, तर प्रचंड राजकीय पाठबळ असणाऱ्या या कुटुंबाच्या संदर्भामध्ये महिला आयोगाने भूमिका घेतली असती की नाही, याविषयी आम्ही साशंक आहोत. कारण अलीकडे महिला आयोगाच्या पदाधिकाऱ्यांच्या आणि राजकारणातील सक्रिय महिला नेत्यांच्या वक्तव्यं, भूमिका स्त्री हिताच्या बाजूच्या असतील याचा भरोसा राहिलेला नाही. म्हणूनच कोणत्याही राजकीय पक्षाचा सदस्य असणाऱ्या महिला नेत्यांना राज्याच्या महिला आयोगामध्ये स्थान देणं चुकीचं ठरत आहे. याच्या बाबतीमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील महिला चळवळींमध्ये उठाव होण्याची गरज आहे.

कुटुंबांतर्गत होणाऱ्या हिंसेच्या संदर्भात २००५ साली अस्तित्वात आलेल्या कायद्यांतर्गत छोट्या-मोठ्या कुरबुरी सुरू झाल्यानंतर लगेचच तक्रार दाखल झाली पाहिजे आणि सदर कायद्यात म्हटलं आहे की, दोन महिन्यांच्या आत निकाल मिळाला पाहिजे. संरक्षणाचा आदेश तर २४ तासांच्या आत मिळायला हवा आहे. परंतु तसे कोर्टात होताना दिसत नाही. संरक्षण अधिकारी तक्रार दाखल करायलाच दोन-दोन महिने लावतात आणि तक्रार दाखल झाल्यानंतर या प्रकारच्या प्रकरणांकडे कोर्टही डोळेझाक करतात. कारण या संदर्भात झालेल्या न्यायनिवाड्याचा त्यांच्या करिअरच्या संदर्भात विचार केला जात नाही, असं म्हणतात. म्हणून सर्वोच्च न्यायालयाने धोरणात बदल करून डीव्ही ॲक्टमध्ये कोर्टाने दिलेल्या न्यायनिवाड्यांचाही त्यांच्या करिअरच्या दृष्टीने महत्त्वाचा न्यायनिवाडा म्हणून नोंद घेतला, तरच या प्रकारच्या प्रकरणांमध्ये दाखल होणाऱ्या गुन्ह्यांबाबत न्यायाधीश अधिक गंभीरपणे आणि तातडीने निर्णय देतील. कुटुंबांतर्गत होणाऱ्या बारीकसारीक कुरबुरीचेच पुढील काळात मोठ्या गुन्ह्यांमध्ये पर्यवसान होते. म्हणून कुटुंबांतर्गत होणाऱ्या हिंसेच्या संदर्भात दाखल प्रकरणांकडे संरक्षण अधिकारी आणि न्यायालयाने देखील गंभीरतेने पाहिलं पाहिजे.

# सत्तेपुढे नीती गौण!



**राजकारण हे चपळ आणि सत्तेच्या समीकरणावर चालणारे शास्त्र आहे. पण जेव्हा एखादा पक्ष स्वतःला भ्रष्टाचारविरोधाच्या झेंड्याचा वाहक म्हणून मिरवतो व पुढे जाऊन त्या झेंड्यालाच गुंडाळून भ्रष्टाचाराच्या सावलीत आश्रय घेतो, तेव्हा प्रश्न केवळ नैतिकतेचा राहत नाही, तो जनतेच्या विश्वासघाताचा होतो आणि महाराष्ट्रातील जनतेसोबत तो सातत्याने केला जात आहे. सत्ताचक्रात भाजपने ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप सातत्याने केले, तेच नेते आपल्या गळयात सुंगधी फुलांची माळ म्हणून घातले आहेत. ताजी घटना ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते छगन भुजबळ यांच्या मंत्रिमंडळ समावेशाची आहे.**

भारतीय जनता पक्षाने २०१४ च्या सत्तेच्या उंबरठ्यावर येताना देशभरात 'ना खाऊंगा, ना खाने दूंगा' चा नारा दिला होता. महाराष्ट्रातही त्याच घोषणांचा ठोसा मारत अनेक नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप लावले गेले. पण पुढे सत्ताचक्रात भाजपने ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप सातत्याने केले, तेच नेते आपल्या गळयात सुंगधी फुलांची माळ म्हणून घातले आहेत. ताजी घटना ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते छगन भुजबळ यांच्या मंत्रीमंडळ समावेशाची आहे. किरीट सोमय्या, देवेंद्र फडणवीसांसह भाजपच्या प्रत्येक नेत्याने छगन भुजबळांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले, आंदोलने केली आणि कालांतराने त्याच भुजबळांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या मंत्रिमंडळात घेतले आहे. भारतीय जनता पक्षाचे हे वागणे फक्त राजकारणाचे नव्हे, तर नैतिकतेचे भयंकर अधःपतन आहे.

### आधी घोटाळेबाज, आता मंत्री

राज्यात काँग्रेस राष्ट्रवादीचे आघाडी सरकार असताना महाराष्ट्र सदन घोटाळा, जमीन व्यवहार या साऱ्यांमुळे छगन भुजबळ यांचे नाव प्रकाशझोतात आले. भाजपने त्यांच्यावर प्रखर हल्ले चढवले. भाजप नेते किरीट सोमय्या यांनी मुंबईतील वांद्रे, सांताक्रुझमार्गे नाशिकपासून दिल्लीपर्यंत आंदोलने करत पत्रकार परिषदा घेऊन रोज भुजबळांवर भ्रष्टाचाराचे बेफाम आरोप केले होते. भाजपने भुजबळांना भ्रष्टाचाराचे प्रतिक बनवले होते. फक्त राज्यच नाही, तर संपूर्ण देशभरातील भाजप नेते त्यांच्यावर धडाधड आरोप करत होते. रस्त्यावर उतरून आंदोलने सुरू होती. पुढे ईडीने त्यांना अटक केली. अडीच वर्ष तुरुंगात राहून ते बाहेर आले. राज्यातील महाविकास सरकार पाडून सत्तेवर आलेल्या शिंदे आणि भाजप सरकारमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस फुटून त्यातील अजित पवार गट सहभागी झाला. भाजपने ज्यांच्यावर ७० हजार कोटींच्या घोटाळ्याचे आरोप केले ते अजित पवार उपमुख्यमंत्री म्हणून फडणवीसांच्या शेजारी बसू लागले. भाजपच्या नेत्यांनीही झाले गेले गंगेला मिळाले या उक्तीप्रमाणे त्यांना आपल्यात सामावून घेतले. सत्तेच्या सोवळ्यात भाजपनेच अजित पवारांवरील घोटाळ्याचे आरोप पुसून घेत त्यांना पवित्र केले. त्याचप्रमाणे महाराष्ट्र सदन घोटाळ्याप्रकरणी जेलमध्ये असलेल्या छगन भुजबळांनी शिंदे-फडणवीस-पवार सरकारचे मंत्री म्हणून मंगळवारी शपथ घेतली. नितीन गडकरींनी सांगितल्याप्रमाणे भ्रष्टाचाराचे आरोप असलेले भुजबळही भाजपच्या वॉशिंग मशिनमध्ये धुऊन स्वच्छ झाले.

### कालचे घोटाळेबाज आज उपमुख्यमंत्री

कधी काळी अजित पवार हे भाजपसाठी 'सिंचन घोटाळ्याचे प्रतीक' होते. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात भाजपने त्यांच्यावर गंभीर आरोप केले. 'जनतेचा पैसा वाया घालवणारे मंत्री' अशी टिका केली. पण २०२३ मध्ये परिस्थिती बदलली आणि तेच अजित पवार भाजप शिंदे सरकारमध्ये उपमुख्यमंत्री बनले! देवेंद्र फडणवीस, विनोद तावडे यांनी रस्त्यावर बैलगाडी भरून पुरावे दाखवले होते. त्या सिंचन घोटाळ्याचे पुढे काय झाले? हे सांगितले नाही. अजित पवारांच्या लाचलुचपत विभागामार्फत चौकश्या सुरु केल्या होत्या त्याचे पुढे काय झाले? राज्य सहकारी बँकेच्या घोटाळ्याचे काय झाले? साखर कारखाने विक्रीच्या घोटाळ्याचे काय झाले? याची उत्तरे ना फडणवीस देतात, ना किरीट सोमय्या, ना भाजप.

### ईडीच्या रडारवरून थेट मंत्रिमंडळात

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते हसन मुश्रीफ यांच्यावर ईडीचे छापे, चौकशी, व्यवहारांची तपासणी चालू असतानाही ते आज मंत्री आहेत. भाजप नेत्यांनी मुंबईतून कोल्हापूरातल्या कागल सारख्या भागात जाऊन मुश्रीफांच्या भ्रष्टाचाराविरोधात आघाडी उघडली होती. या संपूर्ण प्रकरणाचा मोठा ड्रामा वृत्तवाहिन्यांच्या माध्यमातून राज्यातील जनतेने पाहिला होता. सिंचन घोटाळ्यात अजित पवारांच्या बरोबरीने सुनिल तटकरेंवर आरोपांच्या फैरी झाडल्या जात होत्या. भाजपच्या नेत्यांसोबत काही सामाजिक कार्यकर्त्यांनीही त्यांच्याविरोधात मोठा लढा दिला होता. नारायण राणे काँग्रेसमध्ये असताना त्यांच्या १०० पेक्षा जास्त शेल कंपन्या असून त्यांनी हजारो कोटींचे मनी लॉड्रींग केल्याचा आरोप भाजपने केला. ईडीकडे त्यांच्या तक्रारी करण्यात आल्या. त्यांनी काँग्रेस सोडून भाजपत प्रवेश केला आणि त्यांच्या विरोधातील भाजप आणि ईडीच्या कारवाया थांबल्या. भ्रष्टाचाराचे आरोप करून त्यांना आपल्या पक्षात घ्यायचे आणि कारवाई करण्याऐवजी मंत्रीपदाची बक्षिसे देण्याचा नवा पायंडा भाजपने पाडला. हे सर्व सत्तेच्या समीकरणातील 'शुद्धीकरण' नव्हे, तर 'राजकीय स्वार्थाचं सुसंस्कारित पुनर्निर्माण' आहे.

### आणि शिंदे गट स्वच्छ झाला

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना शिवसेनेच्या अनेक आमदार, मंत्री नगरसेवकांवर भाजपने घोटाळ्याचे मनी लॉड्रींगचे आरोप केले. यात पटाईत असणा-या भाजपच्या काही नेत्यांनी साततत्याने पत्रकार परिषदा घेऊन ईडीकडे तक्रारी करून मीडिया ट्रायलच्या माध्यमातून या नेत्यांना दहशतीखाली ठेवले. पुढे योग्य वेळ पाहून या नेत्यांच्या मदतीने शिवसेना फोडली. एकनाथ शिंदेना मुख्यमंत्री करून भाजपने सत्ता मिळवली. गुवाहाटीला जाऊन भाजपसोबत गेलेला शिंदे गट गंगेत डुबकी मारून आल्यासारखा पवित्र झाला. शिवसेनेच्या ज्या आमदार मंत्र्यांना भाजपवाले भ्रष्ट म्हणत होते त्यांना मंत्रीमहोदय म्हणू लागले. भाजपच्या कार्यकर्त्यांनीही हा बदल अगदी सहजपणे स्वीकारला.

### 'सत्तामेव जयते'चा उदय आणि 'नैतिकतेचा अंत'

भाजपाची भ्रष्टाचारविरोधातील झिरो टॉलरन्स पॉलिसी भाषणबाजी आणि निवडणूक घोषणापत्रापुरतीच मर्यादित राहिली आहे हे सातत्याने स्पष्टपणे दिसून येत आहे. स्वायत्त संस्था आणि तपास यंत्रणा राजकीय विरोधकांना दबावात ठेवण्यासाठी वापरल्या जात आहेत. देशभरातील विविध राज्यांमध्ये याची शेकडो उदाहरणे आपल्यासमोर आहेत. आसामच्या हिमांता बिस्वा शर्मा पासून महाराष्ट्रातील विजयकुमार गावित, नारायण राणे यांच्यासारख्या नेत्यांना भाजपने आपल्या वॉशिंगमध्ये धुऊन त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे डाग पुसून काढले. 'भ्रष्टाचारमुक्त भारत' म्हणणारा भाजप ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले, त्यांना स्वतःच क्लीन चिट देऊन मंत्रीपद देतो. मंत्रीपद दिल्यावर त्या नेत्यांची जी बदनामी अगोदर भाजपने केली त्याबद्दल भाजपने क्षमा मागितली पाहिजे पण ते होतानाही दिसत नाही.

### गोड स्वप्न दाखवून फसवणुकीच्या वेदना

वरील उदाहरणांवरून एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे भारतीय जनता पक्षाची भ्रष्टाचारविरोधी भूमिका ही ढोंग, प्रचार, आणि सत्तासंवर्धनाचं साधन बनली आहे. ज्या नेत्यांना कालपर्यंत भ्रष्ट, घोटाळेबाज, जनतेचे शत्रू ठरवले गेले, तेच आज माननीय मंत्री आहेत. कालचं सत्य आज हास्यास्पद वाटतंय. भाजपचे हे राजकारण जनतेच्या संयमाची परीक्षा घेते आहे.

### नैतिकता आता ह्यऑप्शनलह्व

भाजपने प्रचंड मोठा प्रचार करून संघ आणि त्यांच्याशी संलग्न विविध संस्थांच्या माध्यमातून स्वतःचा प्रामाणिक, कणखर आणि शुद्ध चारित्र्याचा चेहरा उभा केला होता. तो चेहरा आता नाटकापुरता केलेला मेकअप ठरला आहे. त्या मेकअप केलेल्या चेहऱ्याचा वापर करून भाजपने आपले सत्य लपवले आणि सत्ता मिळवली. पण या भ्रष्टाचाऱ्यांना पक्षात प्रवेश देऊन मंत्रीपदाच्या खिरापती वाटल्या. भाजपच्या या वॉशिंगमधून भ्रष्ट नेत्यांना स्वच्छ केले. पण यातून त्यांच्यावरील मेकअपही धुऊन गेला असून, त्यांचा भेसूर, विद्रूप, सत्तालोलूप चेहरा जनतेसमोर आला आहे.

# शिष्टाचाराची समज



**बार कौन्सिलतर्फे न्या. गवई यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता, त्यात त्यांनी अत्यंत भावुक होऊन संवाद साधला, कुटुंबीयांसमवेत सत्कार स्वीकारताना त्यांना गहिवरूनही आले.**

भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या महाराष्ट्रातील पहिल्याच जाहीर सत्कारात राजशिष्टाचाराच्या संकेतांचा भंग झाला. बार कौन्सिलतर्फे न्या. गवई यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता, त्यात त्यांनी अत्यंत भावुक होऊन संवाद साधला, कुटुंबीयांसमवेत सत्कार स्वीकारताना त्यांना गहिवरूनही आले. परंतु, त्याचबरोबर राजशिष्टाचाराचे संकेत धाब्यावर बसविल्यावरून मोजक्या शब्दांत त्यांनी आपली नाराजीही व्यक्त केली. आपल्या मातीतील सुपुत्राच्या पहिल्या गृहराज्याच्या भेटीत स्वागताला उपस्थित राहण्याचे महत्त्व राज्याच्या मुख्य सचिव, पोलिस महासंचालक किंवा पोलिस आयुक्तांना वाटत नसेल, तर त्याचा त्यांनीच विचार करावा, असे त्यांनी सुनावले. मणिपूर, नागालँड, आसामपासून अनेक राज्यांच्या दौऱ्यात तेथील प्रशासकीय व पोलिस प्रमुखांकडून झालेल्या स्वागताचा संदर्भही त्यांनी दिला. आपल्या आदरसत्कारापुरता प्रश्न नसून देशातील लोकशाहीच्या स्तंभांनी दुसऱ्या स्तंभांची बूज राखण्याशी ते निगडित आहे, हा महत्त्वाचा मुद्दा त्यांनी मांडला. सरन्यायाधीशांच्या नाराजीनंतर पुढच्याच कार्यक्रमात चूकदुरुस्ती झाली.

राज्य सरकारनेही या प्रकरणाची दखल घेऊन सरन्यायाधीशांना राज्य सरकारच्या कायमस्वरूपी विशेष अतिथींचा सन्मान दिला जाईल, अशी घोषणा केली. आता सरन्यायाधीशांनीच स्वतः प्रसिद्धीपत्रक जारी करून या गोष्टीस अवाजवी महत्त्व देऊ नये, असे स्पष्ट केले आहे. याबाबतीत नेमके लेखी नियम काय, वगैरे चर्चा करण्यात आता अर्थ नाही. परंतु सरन्यायाधीशांनी मांडलेल्या मुद्द्यांवरून बोध मात्र नक्कीच घ्यायला हवा. कित्येकदा न्यायालयीन प्रकरणांमध्येही नागरी कामे, फौजदारी खटले यांच्या तपासातील चालढकलीबाबत न्यायाधीश कोरडे ओढतात, पोलिस आयुक्त, महापालिका आयुक्त यांना उपस्थित राहण्याचे फर्मान काढतात. कारण कित्येकदा कान उपटूनही नागरी किंवा पोलिस यंत्रणा कायद्याला धूपच घालत नाहीत. तर याउलट कित्येक लहानसहान कार्यक्रमांपूर्वी उच्चपदस्थांच्या उपस्थितीचे कारण देत पोलिसांकडून शिष्टाचाराचा बडेजाव माजविला जातो. राजकीय नेत्यांभोवती सुरक्षा अधिकारी व त्यांच्या सचिवांचे कोंडाळे असते व सामान्यांना गाऱ्हाणी मांडण्यासाठीही मंत्र्यांची भेट घेता येत नाही. व्यक्तीपेक्षा त्या पदाची आणि संस्थेची, लोकशाहीच्या स्तंभाची प्रतिष्ठा जपणे हे अधिक महत्त्वाचे असते. मात्र, आजकाल उलट चित्र दिसते. लोकशाहीतील संस्थांचे उच्चपदस्थ हे संस्थानिक बनण्याचा धोका असतो. शिष्टाचार हे आदराचे द्योतक आहे. तो कागदापुरता नको, हाच या प्रकरणाचा बोध आहे.

# पनीर कटलेट

**साहित्य :** २०० ग्रॅम पनीर कुस्करून, २ मध्यम आकाराचे कांदे चिरून, १ गाजर किसून, १ वाटी बारीक चिरलेला कोबी, २ बटाटे उकडून कुस्करून, १ चमचा आले-लसूण पेस्ट, १ चमचा मिरची-कोथिंबीर पेस्ट, २ मोठे चमचे कॉर्नफ्लॉवर, गरजेनुसार मिठ, पाव ते अर्धा वाटी तेल, चाट मसाला.

**कृती :** भांड्यात तेल गरम करून त्यावर चिरलेला कांदा घाला. कांदा गुलाबी रंग येईपर्यंत शिजला की त्यावर



आले-लसूण पेस्ट व मिरची-कोथिंबीर पेस्ट घालून ढवळा. वरील मिश्रणावर कोबी, गाजर घालून २-३ मिनिटेच परतवत शिजवा. चायनीज पदार्थांसारखेच जास्त शिजू देऊ नका. आता कुस्करलेले बटाटे, मिठ घालून पुन्हा चांगले ढवळून लगेच गॅस बंद करा. हे मिश्रण एका ताटात पसरवा व जरा थंड होऊ द्या. मिश्रण थंड झाले की त्यात पनीर व कॉर्नफ्लॉवर टाकून मिश्रण एकजीव करा. आता तुम्हाला हव्या त्या आकाराचे कटलेट करा. व नॉनस्टिक पॅनवर जरासेच तेल घालून शॅलो फ्राय करून घ्या. दोन्ही बाजू मध्यम आचेवर साधारण ५-६ मिनिटे शिजवा. कटलेट तयार झाले की गरम असतानाच त्यावर चाट मसाला टाका. नुसते किंवा सॉस किंवा पुदिना चटणीबरोबर याचा आस्वाद घ्या.

**अधिक टिप :**

- **या कटलेटमध्ये इतर कोणतेही मसाले न वापरल्याने पनीर व भाज्यांचा अस्सल स्वाद येतो.**
- **लहान मुलांना तर खूपच आवडतात. शिवाय कोबीसारखी भाजी खाल्ली जाते.**
- **यात अजून कांद्याची पात, किंवा आपल्या आवडीच्या भाज्या थोड्या प्रमाणावर घालू शकता.**

# न्यूड मेकअप लूकसाठी काही टिप्स



**न्यूड मेकअप लूकचा सध्या खूपच वापर केला जातो. यासाठी ब्लॅक मस्कराचा वापर करा. आपल्याला त्वचेला सूट होईल असा नैसर्गिक रंग आणि गुलाबी रंगाच्या लिप कलरचा वापर करा. आकर्षक दिसण्यासाठी न्यूड मेकअप लूकसाठी कोणत्या टिप्सचा वापर केला पाहिजे, ते जाणून घ्या.**

- आपल्या डोळ्यांना नॅचरल लूक देण्यासाठी पापण्यांना ब्लॅक मस्करा लावा आणि केस कुरळे करा.
- डोळ्यावरच्या आतील कोपऱ्यापर्यंत काजळ लावा. त्यामुळे पापण्या सुंदर आणि आकर्षक दिसतील.
- गालावर नॅचरल चमक येण्यासाठी चीकबोन्सला हायलाइट करा. सध्या न्यूड मेकअप लूकसाठी आपल्या त्वचेला सूट होईल अशा नॅचरल शेडची निवड करा.
- यासाठी हलक्या रंगाचा वापर करा. चेहरा चमकण्यासाठी ओठांना हलक्या गुलाबी रंगाची पिंक शेडची लिपस्टिक लावून त्यावर शाईन येण्यासाठी लिप ग्लॉसचा वापर करा. त्यामुळे अजूनच आकर्षक लूक येईल.
- न्यूड मेकअप लूकसाठी एकाच रंगाच्या वेगवेगळ्या शेड्सचा वापर करा.
- न्यूड शेड्स लावण्याआधी लाईट बेस लावा आणि आवश्यक असल्यास हलक्या हातांनी लूज पावडर किंवा कॉम्पॅक्ट पावडर लावा.

# गरम पाणी पिण्याचे फायदे

**बहुतेक लोक आपल्या दिवसाची सुरुवात चहा किंवा कॉफीच्या गरमागरम कपाने करत असतात. काही लोकांना तर सकाळी उठल्या उठल्या चहा किंवा कॉफी मिळाली नाही, तर त्यांचा अख्खा दिवस वाईट जातो, इतकी त्यांना चहा किंवा कॉफीची सवय झालेली असते. पण या सवयीमुळे कालांतराने बद्धकोष्ठ, पोटदुखी, ॲसिडिटी, पिंपल्स अशा तक्रारी सुरू होतात. असे म्हटले जाते की त्वचा, केस आणि एकंदर शरीराचे आरोग्य सांभाळण्यासाठी भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सकाळी उठल्या उठल्या एक ग्लास गरम पाणी पिण्याची सवयही तुमच्या शरीरातील अनेक विकार मुळापासून दूर करू शकते.**

**सकाळी** उठून नियमितपणे एक ग्लास गरम पाणी प्यायल्याने पचन शक्ती चांगली राहते. तसेच गरम पाणी प्यायल्याने शरीरातील रक्ताभिसरणही चांगले राहते. आपल्या खाण्या-पिण्याच्या अयोग्य सवयींमुळे आपल्या शरीरामध्ये साठत असलेले घातक पदार्थ गरम पाण्याच्या सेवनामुळे बाहेर टाकण्यास मदत होते. तसेच गरम पाण्याच्या नियमित सेवनामुळे शरीरातील अतिरिक्त चरबी घटण्यास मदत होऊन वजन कमी होण्यास मदत होते. योगशास्त्राच्या नियमानुसार तीन महिने गरम पाण्याच्या सेवनाने वजन कमी होऊ शकते. याकरिता इतर कोणतीही विशेष पथ्ये पाळण्याची गरज नाही.

काही लोकांना बद्धकोष्ठाचा त्रास होतो. अशा वेळी सकाळी रिकाम्यापोटी गरम पाणी पिणे फायदेशीर ठरू शकते. पुष्कळ महिलांना मासिक धर्माच्या दिवसांमध्ये डोकेदुखी सतावते. त्यावेळी नियमित गरम पाण्याचे सेवन केल्याने डोकेदुखीपासून आराम मिळतो. तसेच या



दिवसांमध्ये होणारी पोटदुखी ही गरम पाण्याच्या सेवनामुळे कमी होते.

दररोज सकाळी एक ग्लास गरम पाण्यामध्ये थोडासा लिंबाचा रस घालून प्यायल्याने शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढते. ज्यांना सतत बारीकसारीक तब्येतीच्या तक्रारी जाणवत असतील त्यांनी गरम पाणी आणि लिंबाच्या रसाचे दररोज सेवन करणे उत्तम. यामुळे त्वचेचे आरोग्य देखील चांगले राहून, त्वचेवर पिंपल्स येणे कमी होते. तसेच गरम पाण्याच्या सेवनाने ॲसिडिटीचा त्रासही कमी होतो. पुष्कळ लोकांच्या खाण्या-पिण्याचे वेळापत्रक किंवा झोपेच्या वेळा अतिशय अनियमित असतात. शिवाय ज्या लोकांना काही ना काही कारणाने सतत प्रवास करावा लागतो. त्यांनाही बाहेरच्या जेवणावरच काम चालवून घ्यावे लागते. परिणामी ॲसिडिटीसारखे विकार पाठीमागे लागतात. अशा वेळी दररोज सकाळी गरम पाणी पिण्याच्या सवयीने ॲसिडिटीचे प्रमाण कमी होते.

# मासिक पाळी पुढे ढकलताय?

**सण, समारंभ, पर्यटन किंवा धार्मिक कार्याच्या आड येणारी मासिक पाळी पुढे ढकलण्याचा निर्णय अनेक महिला घेतात. मात्र अशा प्रकारे निसर्गचक्रात हस्तक्षेप करणं चुकीचं आहे. बरंच प्रबोधन होऊनही मासिक पाळीबाबतचे गैरसमज कमी झालेले नाहीत. म्हणूनच महिलांना कृत्रिम पद्धतीने पाळी पुढे ढकलावी लागते. मासिक पाळी पुढे ढकलण्यासाठी गोळ्या घेतल्या जातात. पण या गोळ्यांचे शरीरावर दीर्घकालीन परिणाम होतात.**

- मासिक पाळी पुढे ढकलणाऱ्या गोळ्यांच्या सततच्या सेवनामुळे यासंदर्भातल्या नैसर्गिक चक्रावर परिणाम होऊ शकतो. शिवाय महिलांच्या प्रजननक्षमतेवरही याचे घातक परिणाम दिसून येतात.
- या गोळ्यांचं सेवन केल्यानंतर पुढचा काही काळ मासिक पाळीदरम्यान मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव होण्याची शक्यता वाढते. जवळपास २० टक्के महिलांना हा अनुभव येतो. पुढचे काही महिने मासिक पाळीतून अधिक प्रमाणात रक्त जाऊ शकतं.
- या गोळ्या बऱ्याच काळपर्यंत घेत राहिल्यास आरोग्यावर अत्यंत घातक असे परिणाम दिसून येतात. नसांमध्ये रक्ताची गुठळी होण्यासारख्या समस्या जाणवू शकतात. या गोळ्यांमुळे इतर औषधांच्या शरीरावरच्या प्रभावावर विपरित परिणाम होऊ शकतो.
- या गोळ्या घेतल्यानंतर इतर काही दुष्परिणाम होऊ शकतात. जुलाब, हातापायांमध्ये गोळे येणं, अवेळी रक्तस्राव होणं हे दुष्परिणाम दिसून येऊ शकतात.



# कोरफडीचे ५ गुणकारी फायदे

**कोरफड त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे. याच्या नियमित सेवनाने त्वचेसंबंधित अनेक समस्या दूर होतात. जाणून घ्या कोरफडीचे गुणकारी फायदे...**

- सतत कॉम्प्युटरसमोर बसल्याने डोळ्यांवर ताण येतो. डोळ्यांचे आरोग्य चांगले राहाण्यासाठी दोन चमचे कोरफडीचा गर एक कप पाण्यात मिसळून त्याने डोळे धुवा. यामुळे डोळ्यांना आराम मिळेल.
- चेहऱ्यावर पुटकुळ्या आल्यास कोरफडीचा गर चेहऱ्यावर लावा. थोड्या वेळाने चेहरा साध्या पाण्याने धुवा. यामुळे पुटकुळ्या कमी होतील.
- शरीरावर कापल्यामुळे जखम झाली असल्यास त्यावर कोरफडीचा गर लावा.
- कोंड्याची समस्या असल्यास दोन चमचे कोरफडीचा गर कंडिशनरसोबत मिसळा. यामुळे कोंड्यापासून सुटका होईल.
- दातांच्या हिरड्या मजबूत करण्यासाठी हिरड्यांवर कोरफडीचा गर लावा.

# जाणून घ्या टिकली लावल्याने होणारे फायदे



**टिकलीचाही महिलांच्या १६ शृंगारांमध्ये समावेश असून सौभाग्यवती महिला काही वर्षांपूर्वी कुंकवाचा वापर करत असत. पण कुंकवाचा वापर न करता टिकलीचा वापर सध्या महिलावर्ग मोठ्या प्रमाणात करताना पाहायला मिळतात. महिला चेहऱ्यावर लावण्यात आलेल्या टिकलीमुळे केवळ सुंदरच दिसत नाहीत तर त्याचे अनेक आरोग्यदायी फायदेही आहेत. टिकलीचा वापर सामान्यतः महिला ट्रेडिशनल लूकसाठी करतात. पण एका अभ्यासानुसार आरोग्यालाही टिकलीमुळे अनेक फायदे होतात. यामुळेच टिकलीचा वापर अनेक महिला करत आहेत. एवढेच नाही तर वेस्टर्न कपडे परिधान करणाऱ्या महिलाही आपल्या ड्रेसनुसार कलरफुल टिकली वापरण्यास सुरुवात करत आहेत. चेहऱ्यावरील टिकलीमुळे महिला खुपच सुंदर दिसतात आणि त्यामुळे अनेक आरोग्यदायी फायदेही होतात. कपाळावर टिकली लावण्याने अनेक फायदे होतात.**

**कपाळावर** टिकली लावल्यामुळे डोके दुखणे बंद होते. ॲक्युप्रेशर शास्त्रानुसार कपाळावर ज्या ठिकाणी टिकली लावण्यात येते, त्या जागेवर मसाज केल्यास डोकेदुखी तत्काळ बंद होते. टिकली लावलेल्या जागेवर मसाज केल्यास नाकाच्या आसपास ब्लड सर्क्युलेशन चांगल्या पद्धतीने होण्यास सुरुवात होते, ज्यामुळे तुम्हाला खूपच आराम मिळतो.

टिकली दोन्ही भुवयांच्या मध्यभागी ज्या ठिकाणी लावली जाते, शरीरातील सर्व नसा त्याच केंद्रावर एकत्र येतात. टिकली लावण्यात येणाऱ्या या जागेला अग्निचक्र या नावाने सुद्धा ओळखले जाते. म्हणूनच टिकली लावल्याने एकाग्रताही वाढते आणि मन शांत राहते. तसेच, टिकली लावल्याने ताणतणावही कमी होतो.

तुम्हाला पूर्ण झोप मिळत नाही आणि त्यामुळे तुम्ही त्रस्त आहात तर टिकली लावणे तुमच्यासाठी खूपच फायदेशीर होऊ शकते. टिकली शरीरच्या वरच्या भागाला शांत ठेवण्यासाठी खूपच फायदेशीर ठरते. कपाळावर टिकली लावल्याने चांगली झोप येते.

टिकली डोळ्यांच्या नसा मजबूत करण्यास खूपच मदत करते. टिकली कपाळ्याच्या मध्यभागी ज्या ठिकाणी लावली जाते, त्या ठिकाणच्या नसा आणि डोळ्यांमधील नसा यांच्यात एक कनेक्शन असते. टिकली डोळ्यांच्या नसांना मजबूत करण्यास मदत करते ज्यामुळे तुम्हाला एकदम स्पष्ट आणि साफ दिसण्यास मदत होते. एवढेच नाही तर टिकली लावल्याने आसपासचे मसल्स मजबूत आणि हेल्दी होतात.



तुमच्या चेहऱ्यावर जर सुरकुत्या पडण्यास सुरुवात होत आहे तर टिकली लावण्यास तुम्ही सुरुवात करा. कारण, टिकली लावल्याने चेहऱ्यावर येणाऱ्या सुरकुत्यांपासून सुटका मिळण्यास मदत होते.

# शरीरात युरिक ॲसिडचे प्रमाण वाढले असेल तर या नॅचरल ड्रिंक्सने बॉडीला करा डिटॉक्स

**योग्य खानपान आणि औषधांमुळे तुम्ही शरीरात तयार होणाऱ्या युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करू शकता. युरिक ॲसिडची अधिकता शरीराला बऱ्याच प्रकारे नुकसान पोहोचवते. आम्ही तुम्हाला अशा काही नॅचरल ड्रिंक्सबद्दल सांगत आहोत ज्याचे सेवन केल्याने शरीरातील युरिक ॲसिडचे स्तर कमी होतील आणि तुम्हाला त्याचा योग्य फायदा देखील मिळेल.**



**नारळपाणी**

युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करण्याचा सर्वात उत्तम उपाय पाणी आहे. पाण्याशिवाय नारळपाणी देखील युरिक ॲसिडला नियंत्रित करतो. हे युरिक ॲसिडला पातळ करून किडनीला उत्तेजित करतात ज्यामुळे शरीरातून युरिक ॲसिड मूत्राच्या माध्यमाने बाहेर निघून जाते.

**मोसंबी आणि पुदिना**

या ड्रिंकमध्ये पर्याप्त मात्रेत व्हिटॅमिन असतात, जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करण्यास मदत करतात. याचे सेवन करण्यासाठी मोसंबीचे साल काढून त्याच्या बारीक बारीक फोडी करून त्यात लिंबाचा रस आणि पुदिन्याचे पान घालावे व या मिश्रणाला मिक्सरमधून फिरवून त्याचा ज्यूस काढावा व त्याचे सेवन करावे.

**ब्लॅक चेरी आणि चेरी**

ब्लॅक चेरी आणि चेरीचा ज्यूस युरिक ॲसिडमुळे होणारे संधिवात किंवा किडनी स्टोनच्या समस्येसाठी योग्य आहे. ब्लॅक चेरी युरिक ॲसिडच्या सीरम स्तराला कमी करून संधिवात आणि किडनीहून क्रिस्टल दूर करण्यास मदत करते. यात अँटीऑक्सिडेंट आणि अँटी इंफ्लेमेंटरी गुणदेखील असतात, जे युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतात.

**खिऱ्याचे सूप**

खिऱ्याचे सूप शरीराला हायड्रेड ठेवण्यासोबत युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करतो. याचे सेवन करण्यासाठी एका भांड्यात खिऱ्याचा ज्यूस, पाव कप योगर्ट, पुदिन्याचे पान आणि लिंबाचा रस घालून मिक्सरमधून फिरवून घ्या आणि थोड्या वेळाने गार झाल्यावर त्याचे सेवन करा.

**सेबचा सिरका**

सेबचा सिरका शरीरातून युरिक ॲसिडला दूर करण्यास मदत करतो. अँटीऑक्सिडेंट आणि एंटीइंफ्लेमेंटरी गुणांमुळे हे शरीरात क्षारीय ॲसिड संतुलन बनवून ठेवतो. हा सिरका रक्ताच्या पीएच वॉल्यूमला वाढवून युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतो.

**अननसाचा ज्यूस**

या ज्यूसमध्ये व्हिटॅमिन सी सोबत इतर अँटीऑक्सिडेंट असतात जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करून शरीरातून बाहेर काढण्यात मदत करतात. याचे सेवन केल्याने शरीराला दुसरे इतर फायदेदेखील मिळतात.

# नाश्त्यामध्ये ब्रेड, कॉर्नफ्लेक्स खाणे शरीरासाठी हानीकारक

**सकाळच्या** नाश्त्यामध्ये अधिक जणांना ब्रेड, कॉर्नफ्लेक्स आणि अनेक तळलेले पदार्थ खाण्याची सवय असते. मात्र हे पदार्थ फुफ्फुसाच्या कॅन्सरला कारणीभूत ठरत असल्याचे नव्या संशोधनात समोर आलेय. व्हाईट ब्रेड, कॉर्नफ्लेक्स असे ग्लायसेमिक इंडेक्सयुक्त पदार्थ खाल्ल्याने फुफ्फुसाचा कॅन्सर वाढण्याची शक्यता असते. संशोधनादरम्यान ज्यांना हा आजार झाला होता अशा एक हजार ९०५ जणांना समाविष्ट केले होते. त्याचबरोबर दोन हजार ४१३ स्वस्थ व्यक्तींचेही निरीक्षण करण्यात आले. यादरम्यान त्यांच्या आहाराच्या सवयी जाणून घेतल्या. शोधकर्त्यांचे म्हणणे आहे की तंबाखू तसेच धूम्रपान न करणाऱ्या लोकांमध्येही फुफ्फुसाच्या कॅन्सरची लक्षणे आढळली. ज्यावरून त्यांच्या आहाराच्या सवयी या कॅन्सरसाठी कारणीभूत असल्याची शक्यता आहे.



# अनशापोटी करा गुळाचे सेवन

**अनशापोटी गूळ खाल्ल्यास ४ फायदे होतात. आपल्यापैकी बहुतेक लोक रात्री जेवल्यानंतर गूळ खातात. त्यामुळे जेवण पचण्यास मदत होते. अनशापोटी गूळ खाल्ल्यावर कोमट पाणी प्यायल्यास त्याचे आरोग्यासाठी अनेक फायदे असतात.**

**रक्तदाब नियंत्रणात राहातो :** रक्तदाब नियंत्रणासाठी गूळ प्रभावी ठरतो. गुळामध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शिअम आणि फॉस्फरस आढळते. हे हाडांच्या मजबुतीसाठी आवश्यक आहेत. गुळाबरोबर आले सेवन केल्यास सांधेदुखीपासून मुक्ती मिळते.



**रक्त साफ होते :** सकाळी अनशापोटी गूळ खाऊन कोमट पाणी प्यायल्यास रक्त स्वच्छ होते. त्यामुळे नवीन रक्त तयार होते. हृदयरोग होण्याचा धोका दूर ठेवण्यासही गुळाच्या सेवनाचा फायदा होता.

**शरीराला मिळते ताकद :** गुळाच्या नियमित सेवनाने शरीर ताकदवान होते. दिवसभराचा थकवा दूर होण्यासही मदत होते. शरीरात ऊर्जा पातळी कायम राहाते आणि ती कमी होत नाही.

**पचनसंस्था मजबूत होते :** ज्या लोकांना आहार सहजपणे पचवण्यात अडचणी येतात त्यांनी गूळ आणि गरम पाणी सेवन करावे. या व्यक्तींसाठी ते औषधासारखे कामकरते. त्याचबरोबर बद्धकोष्ठता, पोटात वायू होणे, ॲसिडीटीसारख्या समस्यांपासून सुटका होण्यास मदत होते.

# 'या' चुका टाळल्या तर लग्नात वधूचा मेकअप होणार नाही खराब!



**घरात लग्नकार्य असलं की कामाची नुसती लगबग सुरू असते. धावपळ, धांदल असा सगळा माहोल असतो. मात्र अशा वातावरणातही एक आनंद, उत्साह असतो. लग्न म्हणजे दोन जिवांचंच नव्हे तर दोन कुटुंबांचं मीलन असतं. त्यामुळे हा दिवस घरातल्या प्रत्येकासाठी खास असतो. त्यातच वधू-वरांचा थाट तर काही औरच असतो. प्रत्येकाचं लक्ष या दोघांकडेच वेधलेलं असतं. लग्नात आलेल्या पाहूण्यांच्या नजरा, कॅमेरा हे जणू वधू-वरांकडेच केंद्रित झालेले असतात. त्यामुळे लग्नात सुंदर दिसण्यावर या दोघांचाही भर असतो. त्यातच वधू असेल तर विचारायलाच नको. अगदी साड्यांपासून मेकअपपर्यंत प्रत्येक गोष्ट खास असण्यावर तिचा भर असतो. मेकअपमुळे सौंदर्यात भर पडतेच. मात्र बऱ्याच वेळा उत्तम प्रतीच्या मेकअपचं सामान वापरूनही तो मेकअप नीट सेट होत नाही किंवा ऐनवेळी तो खराब दिसून लागतो. हे असं का होतं यामागे बरीच कारणं आहेत. यामध्ये आपल्या बदललेल्या जीवनशैलीचादेखील समावेश आहे.**

**हेअर कलर :** बदलत्या काळानुसार रोज नवनवी ट्रेंड बाजारात येत असतात. सध्या तरुणाईमध्ये हेअर कलर करण्याची क्रेझ दिसून येत आहे. त्यामुळे बऱ्याच तरुणी वेगवेगळ्या रंगांनी केस कलर करत असतात. पण काही वेळेस उत्सुक होऊन केलेला हेअर कलर त्यांचा चेहऱ्याला शोभून दिसत नाही. त्यामुळे लग्नासाठीचा लुक खराब होऊ शकतो. हेअर कलर व्यवस्थित सेटल होण्यासाठी १० ते १५ दिवस लागतात. त्यामुळे लग्नाच्या ४ ते ५ दिवस आधी हेअर कलर केल्यास जो लूक आपल्याला अपेक्षित आहे तो मिळणार नाही. म्हणूनच लग्नापूर्वी जर केस कलर करायचे असतील तर निदान महिनाभर आधी कलर करावेत.



**हेअरकट :** हेअर कलरप्रमाणे हेअरकट देखील लग्नाच्या ४-५ दिवस आधी करू नये. कधी कधी हेअरकट आपल्याला हवा तसा होतं नाही किंवा तो ब्रायडल लूकला साजेसा नसतो. त्यामुळे लग्नात हेअरस्टाइल करताना अडचणी येऊ शकतात. त्यामुळे महिनाभर आधी हेअरकट केल्यास ते चांगले ठरते.


**लग्नापूर्वी सुंदर दिसण्यासाठी केलेले उपाय :** लग्नात सुंदर दिसावं ही प्रत्येक तरुणीची इच्छा असते. त्यामुळे बऱ्याच वेळा मुली फेशिअल, ब्लिच, क्लीनअप असे नानाविध प्रकार करतात. पण लग्नाच्या ४-५ दिवसआधी ब्यूटी ट्रीटमेंट करणं नुकसानदायक ठरत. कारण काही मुलींची स्कीन सेन्सिटीव्ह असते, काहींची ड्राय तर काहींची ऑइली असते. त्यामुळे अशा त्वचेसाठी वेगवेगळ्या ब्युटी ट्रीटमेंट असतात. मात्र काही वेळा योग्य प्रोडक्ट किंवा क्रीम न वापरल्यामुळे त्याचा परिणाम चेहऱ्यावर होऊ शकतो. चेहऱ्यावर लाल पूरळ किंवा पुटकुळ्या येऊ शकतात.

**अतिरिक्त व्यायाम :** लग्नात बारीक दिसावं याकडे मुलींचा जास्त कल असतो. त्यामुळे मुली बऱ्याचदा लग्नापूर्वी डाएट, व्यायाम करतात. तसंच लग्नाच्या १०-१२ दिवस आधी हार्ड वर्कआऊट करतात. परंतु यामुळे त्या थकतात आणि सोबतच चेहरा ही अगदी फिका पडतो.

**फास्ट फूड खाणे :** लग्नात मेकअपमुळे तर आपलं सौंदर्य वाढतंच मात्र त्याचप्रमाणे चेहऱ्यावर तजेला असणंही गरजेचं आहे. तजेला असेल तरच सौंदर्यात भर पडते. नितळ आणी सतेज चेहरा हवा असेल तर आपल्या आहाराकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे. या काळात फास्ट फूड खाणं कमी करावं आणि पौष्टीक पदार्थ खाण्यावर भर द्यावा. फास्ट फूड खाल्यामुळे बऱ्याचदा चेहऱ्यावर पिंपल्स येण्याची शक्यता असते. त्यामुळे शक्यतो फास्ट फूड टाळावे.

# घसादुखीवर 'हे' झटपट घरगुती उपाय नक्की येतील कामी

**ऋतू** बदलले की शरीराच्या अनेक समस्या उद्भवतात. तसेच थंडीत अंगदुखी, पाठदुखीसोबत घसा खवखवणे, घसा दुखणे असे आजार देखील उद्भवतात. अशा वेळी आपल्याला कधी कधी गिळताना, बोलताना घशाला त्रास होतो. यालाच Throat inffection असेही म्हणतात. साधारणतः सर्दी, खोकला याप्रमाणे हा घशाला होणारा त्रास हे देखील व्हायरल इन्फेक्शन आहे. हे इन्फेक्शन काही दिवसांत आपोआप कमी होते. यामुळे याच्यावर काही इलाज करु नये असेही नाही. त्या समस्येकडे लक्ष न दिल्यास घशाला सूज येणे, टॉन्सिल्स लाल होणे, त्यावर पांढरे चट्टे येणे यांसारखे गंभीर आजार होऊ शकतात. अशा वेळी मग यावर त्वरित काय उपाय करता येईल अशा प्रश्न अनेकदा पडतो. म्हणूनच यावर झटपट घरगुती उपाय कोणते करता येईल ते पाहूया..



१. घशाला सूज उतरवण्यासाठी गरम पाणी पिण्याचे व हळद मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करता येतील.

२. घसा दुखत असल्यास तोंडात आल्याचा तुकडा ठेवल्यास थोडा आराम मिळतो.

३. आलं, टोमॅटो आणि मधाचा रस एकत्र करून घेतल्याने घसादुखीपासून आराम मिळतो.

४. मध आणि कांदा टाकून उकळलेलं पाणी गाळून ते थोड्या-थोड्या वेळाने प्यावे.

५. पाण्यात बडीशेप टाकून ते पाणी उकळून घ्यावं आणि त्यानंतर त्यात मध टाकून हे पाणी थोड्या थोड्या वेळाने प्यावे. याने घशाला आराम मिळेल.

याप्रमाणेच लिंबाचा रस आणि मध टाकलेले गरम पाणी प्यायल्यानेही घशाला आराम मिळतो. लवंग चघळल्यानेही घसादुखी कमी होते. थंडीत तुम्हाला जर तुम्हाला घसादुखीचा त्रास उद्भवत असेल तर हे उपाय नक्कीच मदत करतील.

# पावसाळ्यात ठाणे तुंबले तर ठामपा जबाबदार-राजन विचारे

**■ठाणे** : ठाण्यातील नालेसफाईला ३१ मे ची डेडलाईनला काही दिवस उरले असून कामे अजूनही अर्धवट आहेत. त्यातच अर्धे ठाणे खोदून ठेवले रस्ते असून तलावांची झालेली दुरावस्था, कर्चयाच्या समस्या, नालेसफाई समस्या, घोडबंदर पट्ट्यात अपूर्ण असलेल्या कामांमुळे यंदाच्या पावसाळ्यात ठाणे तुंबले तर याला प्रशासन जबाबदार असल्याची टीका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते, माजी खासदार राजन विचार यांनी केली आहे. ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या दालनात शिवसेना नेते राजन विचारे यांनी बुधवारी आयोजित बैठक आयोजित केली होती. या बैठकीत तलावांचे शहर ओळखल्या जाणाऱ्या ठाणे शहरांतील तलावांच्या झालेल्या दुरवस्थेवर आणि नालेसफाईच्या कामाबाबत चर्चा करण्यात आली. एखादा लोकप्रतिनिधी वारंवार पत्र देऊन जर त्या पत्रांची पालिकेकडून दखल घेतली जात नसेल तर न्याय कोणाकडे मागायचा? असा सवाल राजन विचारे यांनी उपस्थित केला. सध्या महापालिकेत लोकप्रतिनिधी नसल्याने प्रशासन कारभार संभाळत आहे. आपल्याला वाटेल तसे काम अधिकारी करत आहेत. मागील सहा महिन्यापासून ऐतिहासिक अशा सिद्धेश्वर तलावाची झालेल्या दुरवस्थेबाबत वारंवार पत्र देऊन तलावातील गाळ काढण्याची मागणी करत होते. याचा नियोजित आराखडा ही मंजूर करून निधी अभावी काम थांबवून याकडे गांभीर्याने दुर्लक्ष करून आवडत्या ठेकेदारांची बिले काढण्यात अधिकारी व्यग्र आहेत. या त्यांच्या निष्काळजीमुळे तलावातील मासे मरत आहे. सिद्धेश्वर तलाव, ब्रम्हाळा तलाव, मदार्डे तलाव मासे दगावण्यास अधिकारी जबाबदार आहेत. पावसाळा लक्षात घेऊन गाळ न काढल्याने जर या तलावातील पाणी शेजारील झोपडपट्ट्यांच्या घरात घुसण्याची भीती आहे. असे झाल्यास संबंधित विभागातील अधिकाऱ्याला जबाबदार धरून त्यावर गुन्हे दाखल करा, अशी मागणी विचारे यांनी आयुक्तांकडे पत्राद्वारे केली.




**पावसाळा आल्यावर नालेसफाई**

पावसाळा तोंडावर आला असताना शहरातील नालेसफाई ४५ टक्के झाली असल्याचा दावा प्रशासनाने केला. उर्वरित ५५ टक्के नालेसफाई कधी पूर्ण करणार? असा सवाल विचारे यांनी केला. साफसफाई करणारे ठेकेदार नाल्यातील वरवरचा कचरा उचलून गाळ तसाच खाली ठेवतात. मोठा पाऊस आला की सर्व कचरा पावसाच्या वेगाने पुढे ढकलला जातो. त्यामुळे त्यांचे काम हलके होते मात्र पाणी तुंबण्यची शक्यता वाढते, हे अधिकाऱ्यांना दिसत नाही का?

# पावसाळ्यापूर्वी आमचे पुनर्वसन करा



**■कल्याण** : कल्याण पूर्वेतील सप्तश्रृंगी इमारत दुर्घटना प्रकरणातील रहिवाशांनी केडीएमसी मुख्यालयावर धडक देत पुनर्वसनाची मागणी केली. कल्याण पूर्वेतील चिकणीपाडा सप्तश्रृंगी इमरतीचा स्लॅब कोसळल्याच्या दुर्घटनेत ६जणांचा दुर्दैवी मृत्यू तर सहा जण जखमी झाल्याची घटना मंगळवारी घडली. प्रशासनाने मदतकार्य करीत रहिवाशांना तात्पुरती राहण्यासाठी व्यवस्था नतून ज्ञानमंदिर शाळेमध्ये केली आहे. मात्र या इमारतीतील रहिवाशांचे कुटुंब रस्त्यावर आले आहे.

तर काहींच्या कुटुंबातील सदस्यांचा मृत्यूच्या धक्क्यातून अद्याप कुटुंबे सावरली नाहीत. दोन दिवसानंतर प्रशासनाने पाच दहा मिनिटात आपले महत्वाचे साहित्य काढण्याची मुभा दिली. मात्र एवढ्या कमी वेळेत काय शोधावे, काय सोडावे असा प्रश्न रहिवाशांपुढे आहे, असे रेखा किरण पाठारे यांनी सांगितले.

शाळेमधील तात्पुरती सोय ही शाळा सुरू होण्याआधी कधीही बंद होऊ शकते. त्यामुळे आमचे पुनर्वसन करावे, अशी मागणी करत घोषणा पालिका मुख्यालयासमोर रहिवाशांनी केल्या आहेत. मृत्यू पावलेल्याना जाहीर केलेली सरकारी मदत तातडीने मिळावी. तसेच उपचार झालेल्या, उपचार सुरू असलेल्यांना तातडीने मदत द्यावी. पावसाळा सुरू होण्यापूर्वी पुनर्वसन करावे, अशी मागणी केडीएमसी मुख्यालय प्रवेशद्वारासमोर जमलेल्या दुर्घटनाग्रस्त कुटुंबियांच्या वतीने प्रसारमाध्यमांकडे करण्यात आली. या प्रकरणी केडीएमसी आयुक्तांच्या भेटीसाठी आपल्या मागण्या घेऊन गेलेल्या शिष्टमंडळाला अतिरिक्त आयुक्त यांनी शुक्रवारी सकाळी ११ वाजण्याची वेळ दिली आहे.

# माथेरानमधून माझे वन उपक्रमाचा आरंभ
## उप वनसंरक्षक राहुल पाटील यांची संकल्पना



**■माथेरान** : यंदाच्या पावसाळ्यापासून ''माझे वन'' या योजने अंतर्गत रायगडमधील ३३८ एकर क्षेत्र हिरवेगार करण्याचे लक्ष्य आहे. या उपक्रमाचा आरंभ माथेरानमधून करण्यात आला आहे. वनमंत्री गणेश नाईक यांनी गुरुवारी (२२ मे) कर्जत तालुक्यातील शेलू येथे तपासणी नाक्याचे उद्घाटन करताना या उपक्रमाची माहिती दिली.

नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील खांडा येथे इंग्रजांच्या काळातील वास्तू पाडून नवीन इमारत बांधण्यात आली आहे. शिवाय नवा तपासणी नाका उभारला आहे. या दोन्ही वास्तूंचे उद्घाटन वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. ह्यमाझे वनह्ण ही रायगड जिल्हा उप वनसंरक्षक राहुल पाटील यांची ही संकल्पना असून घटणाऱ्या वनांना लोकाश्रय मिळून वनीकरण वाढण्यास मोठी मदत होणार आहे, याकडे वनमंत्री नाईक यांनी लक्ष वेधले. वन कर्मचाऱ्यांनी निवडलेल्या एक एकर क्षेत्राला त्यांच्या स्वेच्छेने नाव देण्याची नाविन्यपूर्ण अशी ही योजना आहे.

'माझे वन' उपक्रमातून प्रत्येक रेंजमध्ये सुरंगी आणि बहाडोली या जांभळाच्या जातीची झाडे १ एकरमध्ये लावायची आहेत. अलिबाग (प्रा.) वन विभागात १ उप वनसंरक्षक, २ सहाय्यक वनसंरक्षक, १२ वन परिक्षेत्र अधिकारी, ७४ परिमंडळ अधिकारी आणि २४९ नियत क्षेत्र अधिकारी अशी एकूण ३३८ क्षेत्रीय पदे आहेत. प्रत्येक वन कर्मचाऱ्याने वन विभागातील एक एकर क्षेत्राची निवड करुन यंदा पावसाळ्यात स्वेच्छेने आणि स्वखर्चाने जांभूळ वृक्षांची लागवड करावयाची आहे. या वृक्षांचे संपूर्ण संपूर्ण जबाबदारी घ्यायची आहे. या उपक्रमा अंतर्गत वनीकरण केल्यास रायगडमध्ये ३३८ एकरवर यंदा वनीकरण होणार आहे. ''माझे वन'' उपक्रमामुळे वनीकरणावर वैयक्तिक लक्ष दिले जाणार असल्याने, घटत जाणाऱ्या वनांचे वनीकरण होऊन वृक्षाच्छादन वाढण्यास भरीव मदत होणार आहे.

### आदिवासी वाडीला रस्ता मिळणार

माथेरान स्थित नेरळ विभागातील वाघीणीची वाडी आणि कर्जत पूर्व वनक्षेत्रालगत असलेल्या मावळ तालुक्यातील मौजे कळकराई स्वातंत्र्यापासून रस्त्यापासून वंचित आहेत. तसेच कर्जत पश्चिम वन विभागांतर्गत मोहिली-निकोप ते अवसरे हा जोडरस्ता बऱ्याच वर्षांपासून प्रलंबित आहे. या रस्त्यांच्या कामांसाठी रायगड जिल्हा उप वनसंरक्षक राहुल पाटील यांनी वनहक्क कायदा २००६ अंतर्गत अनुसूचित जमाती तथा पारंपरिक वननिवासी यांची सोयीसुविधा ३(२) अंतर्गत वनजमीन मागणी प्रस्तावाचे वाटप वनमंत्री गणेश नाईक आणि इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच वन संरक्षण आणि वनसंवर्धनासाठी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या संयुक्त वनस्थापन समित्यांना प्रमाणपत्राने सन्मानित करण्यात आले.

### नागाव पर्यावरणपूरक होणार

शिवाय स्वच्छ समुद्रकिनारे उपक्रम अंतर्गत अलिबाग तालुक्यातील नागांव ग्रामपंचायत आणि वनक्षेत्र अलिबाग यांच्यात सांमजस्य करारदेखील करण्यात आला. यातून नागाव बीचला पर्यावरणपूरक आणि आंतरराष्ट्रीय दजार्चे पर्यटनस्थळ बनविण्याचा निर्धार करण्यात आला आहे. दरम्यान, वणवे, वृक्षारोपण, अतिक्रमण निर्मूलन, वनांच्या हद्दीखुणा इत्यादीसाठी एआय तंत्रज्ञान कृत्रिम बुद्धिमत्ताचा वापर करण्यासाठी वन उप वनसंरक्षक अलिबाग अंतर्गत येणाऱ्या वनक्षेत्र कर्जत पूर्व आणि युनिव्हर्सल एआय विद्यापीठ यांच्यात सांमजस्य करार करण्यात आला.

यावेळी कर्जत-खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे यांनी कर्जत-कल्याण राज्य महामार्गाच्या रुंदीकरणासाठी नेरळ व शेलू येथील वनविभागाकडून येणाऱ्या अडचणी दूर करणे तसेच कर्जतसाठी सुसज्ज वन उद्यानाची मागणी केली आणि त्याला वनमंत्री गणेश नाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाला राज्याचे प्रधान सचिव वन बल प्रमुख शोमिता विश्वास, मुख्य वन संरक्षक ठाणे के प्रदिपा, प्रांताधिकारी प्रकाश संकपाल आदी उपस्थित होते.

# मनपा शाळा सुरू झाल्याबरोबरच शालेय साहित्य मिळणार : केडीएमसी प्रशासन


**■डोंबिवली** : कल्याण डोंबिवली मनपा शाळेतील दरवर्षी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप उशिराने होते. मात्र यंदा शैक्षणिक साहित्य जूनमध्ये सुरू झाल्यानंतर लगेच दिले जाणार आहे. कल्याण डोंबिवली मनपा शिक्षण विभागा मार्फत प्राथमिक ५९ शाळा, माध्यमिक २ अशा एकूण ६१ शाळा आहेत. २०२४-२०२५ शैक्षणिक वार्षिक सत्रानुसार मनपा शाळामध्ये मुले,४,०७१, मुली ४,३६७ एकूण ८४३८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यंदा जून महिन्यातच शैक्षणिक साहित्याचे वाटप होईल, असा दावा शिक्षण विभाग प्रशासनाकडून केला जात आहे. १५ जूनपासून शाळा सुरू होत आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गोरगरीब कुटुंबातील मुले-मुली पालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेत असतात. केडीएमसीच्या शाळा जूनमध्ये सुरू होतात. परंतु मुलांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप उशिराने होते. आणि त्यांचा फटका विद्यार्थी वगार्ला बसतो. मात्र यंदा मनपा प्रशासनाने शालेय विद्यार्थ्यांना वेळेत शालेय साहित्य, गणवेश देण्यासाठी जय्यत तयारी केली आहे.



केडीएमसीच्या बालवाडी ते इयत्ता चौथीपर्यंत मुलांना हाफशर्ट, हाफपॅन्ट तर इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना हाफशर्ट, फुलपॅन्ट आणि टाय असा गणवेश आहे.

बालवाडी ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थिनींना पिनो फ्रॉक आणि शर्ट तसेच पाचवी ते दहावीपर्यंत सलवार कुर्ता आणि ओढणी असा गणवेश आहे. त्याचबरोबर बूट मोजे, रेनकोट पुरविले जातात. इयत्ता पहिली ते दुसरीच्या विद्यार्थ्यांना नऊ वह्या, इयत्ता तिसरी ते चौथीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी १० वह्या आणि चित्रकलेची वही तर इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी १७ वह्या दिल्या जातात. शाळा सुरू होताच पहिल्याच दिवशी वह्यांचे वाटप केले जाणार आहे. शालेय साहित्य खरेदी निविदाप्रक्रियेला विलंब, लेखा विभागाची वेळेवर मंजुरी न मिळणे आदीमुळे दरवर्षी शाळा सुरू झाल्यावर काही महिने जुने गणवेश घालूनच विद्यार्थ्यांना शाळेत जावे लागते. कल्याण डोंबिवली शिक्षण विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, शिक्षण विभागाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी वर्षभर राबविल्या जार्णाया कार्यक्रमांच्या नियोजनाचे एक वेळापत्रक बनविले असून, शैक्षणिक साहित्यांचे वाटप जूनमध्येच होईल, असे नियोजन आहे. पालिका शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांच्या वाटपासाठी निविदा प्रक्रिया पार पडली आहे. तसेच काहींची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. १५ जूनला वह्यांचे वाटप केले जाणार असून उर्वरित सगळे साहित्यही जून महिन्यातच मिळेल यासाठी आमचा प्रयत्न राहतील असेही त्यांनी सांगितले.

# जंजिरा किल्ल्याबाबत सरकारचा मोठा निर्णय



**■अलिबाग** : मुरुड तालुक्यातील जंजिरा किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांसाठी महत्त्वाची बातमी आहे. रविवार (२५ मे) संध्याकाळनंतर जंजिरा किल्ल्याचे दरवाजे तब्बल चार महिन्यांसाठी बंद होणार आहेत. त्यामुळे जंजिरा किल्ला पाहायचा असल्यास रविवारपर्यंत संधी आहे. तरीही समुद्र खवळलेला असल्यास २५ मेपूर्वीही जंजिरा किल्ला पाहण्याची संधी मिळेलच याची खात्री नाही, हेही लक्षात असू द्या!

सध्या सुट्ट्यांचा हंगाम आहे. शाळा-महाविद्यालयांना सुट्टी असल्यामुळे जंजिरा किल्ला पाहण्यासाठी पर्यटकांची रिघ लागली आहे. मात्र, खवळलेला समुद्र असल्यास किल्ल्याकडे बोटी सोडल्या जात नाहीत. त्यामुळे पर्यटक नाराज होता. दरवर्षी मे महिन्याच्या अखेरीस जंजिरा किल्ला पर्यटकांसाठी बंद केला जातो. या कालावधीत समुद्र खवळायला सुरुवात झालेली असते. मोठ्या लाटा उसळू लागतात. अशावेळी शिडाच्या बोटीतून प्रवास करणे धोकादायक असल्यामुळे पर्यटकांची सुरक्षितता लक्षात घेऊन जंजिरा किल्ला पर्यटकांसाठी बंद केला जातो.

**जंजिऱ्याची खासियत**

जंजिरा हा जलदुर्ग असून तो २२ एकरवर बांधण्यात आला आहे. किल्ल्यावर १९ बुरुज आहेत. पूर्वी ५१४ तोफा होत्या. त्यातील मोजक्याच सध्या दिसतात. इतिहासात 'अजिंक्य' अशी जंजिऱ्याची नोंद आहे. अत्यंत भक्कम असलेला किल्ला हे पर्यटकांचे आकर्षण आहे. त्यामुळे जंजिरा किल्ला पाहण्यासाठी दरवर्षी ५ लाखांहून अधिक पर्यटक राज्यासह देशविदेशातून येत असतात.

यंदा २६ मेपासून जंजिरा दर्शन बंद केल्याचे पुरातत्व विभागाचे अधिकारी बजरंग येळीकर यांनी कळवले आहे.

पावसाळ्यात समुद्रात उसळणाऱ्या उंच लाटा, वादळ, हेलकावे यामुळे दुर्घटना होऊ शकते. हे टाळण्यासाठी पुरातत्व विभाग आणि मेरिटाइम बोर्ड दरवर्षी राजपुरी खाडीतील जंजिरा जलदुर्ग पर्यटकांसाठी बंद ठेवतात. शिडाच्या बोटी हेलकावे घेत असल्याने किल्ल्याच्या तटावर उतरणे जिकरीचे होते. तसेच खवळलेल्या समुद्रातून बोटीने प्रवास करणेही पर्यटकांसाठी सुरक्षित नाही.

> "पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी दरवर्षी २५ किंवा २६ मेपासून जंजिरा किल्ला पर्यटकांना आतून पाहण्यासाठी बंद केला जातो. मेअखेरीत समुद्रात मोठ्या लाटा उसळत असल्याने सरकार हा निर्णय घेते. यंदा २६ मेपासून जंजिऱ्याचे दरवाजे बंद करण्याचे आदेश मेरिटाईम बोर्ड आणि पुरातत्व खात्याला मिळाले आहेत."
>
> **-बजरंग येळीकर, पुरातत्व विभाग अधिकारी, अलिबाग-मुरुड**

# परिचारिकांना आठ दिवसांची सुट्टी
## उपायुक्तांसोबत सकारात्मक चर्चा



**■मुंबई** : मुंबई महानगरपालिकेच्या सायन, नायर आणि केईएम रुग्णालयात कार्यरत असलेल्या परिचारिकांना महिन्याला आठ सुट्ट्या मिळतात. परंतु, कूपर, कस्तुरबा आणि क्षयरोग रुग्णालयासह उपनगरांतील रुग्णालयात कार्यरत परिचारिकांना केवळ सहा दिवस सुट्ट्या मिळत आहेत.

प्रशासनाकडून सापत्न वागणूक मिळत असल्याचा आरोप परिचारिकांनी केला होता. यासंदर्भात परिचारिकांच्या चार संघटनांची नुकतीच उपायुक्त शरद उघडे यांच्यासोबत झालेल्या बैठकीमध्ये त्यांनी सर्व परिचारिकांना आठ सुट्ट्या लागू करण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दर्शविला.

याबाबत काही बैठका झाल्यानंतर निर्णय जाहीर करण्यात येईल, असे आश्वासनही त्यांनी दिले. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरीय रुग्णालयांमध्ये कार्यरत असलेल्या जवळपास साडेतीन हजार परिचारिकांना आठ दिवस सुट्ट्या मिळणार आहे.

**परिचारिकांच्या मागण्या**

- केईएम, शीव व नायर रुग्णालयातील परिचारिकांच्या ८ सुट्यांसंदभार्तील प्रशासनाने काढलेले परिपत्रक बेकायदेशीर असून ते मागे घेण्यात यावे.
- सर्व रुग्णालयातील परिचारिकांना आठ सुट्या त्वरित लागू कराव्या.
- उपनगरीय, शिवडी टी.बी. व कस्तुरबा रुग्णालयांतील परिचारिकांना महिन्याला सहा सुट्या मिळतात.
- परिचारिकांना मागील तीन वर्षांच्या प्रत्येक महिन्याच्या वाढीव दोन सुट्यांप्रमाणे ४८ ते ७२ दिवसांची विशेष रजा देण्यात यावी.

# चाकू तलवारीच्या हल्ल्यात एकाचा खून, तिघे जखमी

**■अलिबाग** : जुन्या भांडणाचा राग मनात ठेवून अलिबाग तालुक्यातील आवास गावात करण्यात आलेल्या हल्ल्यात एकाचा मृत्यू झाला असून तिघे जबर जखमी झाले आहेत. ही घटना गुरुवारी (२२ मे) रात्री सव्वानऊच्या सुमारास घडली. यात धर्मेंद्र नंदकुमार राणे (३६, राणे आळी, आवास) यांचा मृत्यू झाला आहे. तर विवेक नंदकुमार राणे, विश्वास नंदकुमार राणे आणि करुणा नंदकुमार राणे हे तिघे जबर जखमी झाले आहेत. या प्रकरणी अटक केलेल्या पाच आरोपींना शुक्रवारी संध्याकाळी ५ वाजता अलिबाग सत्र न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.



**काय घडलं?**

विवेक नंदकुमार राणे (३४) आणि त्यांचे कुटुंबीय त्याची चारचाकी गाडी घरासमोरील शेडमध्ये लावत होते. गाडीत पावसाचे पाणी जात असल्याने ते शेडमध्ये ठेवत होते. त्यावेळी देवेंद्र लक्ष्मण म्हात्रे, अंकित अशोक राणे, शुभम संतोष पाटील, वैभव लक्ष्मण म्हात्रे, पूनम देवेंद्र म्हात्रे आणि सिया देवेंद्र म्हात्रे हे चाकू, सुरा आणि तलवारीसह तेथे आले. त्यांनी राणे कुटुंबाला शिवीगाळ करून मागील भांडणांचा मनात राग धरून भांडण करण्यास सुरुवात केली.

अलिबाग तालुक्यातील मांडवा सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत आवास गावात गुरुवारी भांडणाच्या रागातून चाकू, सुरा, तलवारीसह राणे कुटुंबावर सशस्त्र हल्ला करण्यात आला. तिन्ही जखमींवर अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या सशस्त्र हल्ला आणि खूनप्रकरणात देवेंद्र लक्ष्मण म्हात्रे, अंकित अशोक राणे, शुभम संतोष पाटील, वैभव लक्ष्मण म्हात्रे, पूनम देवेंद्र म्हात्रे आणि सिया देवेंद्र म्हात्रे या सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी पाच जणांना अटक करण्यात आली असल्याची माहिती मांडवा सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक भोई यांनी दिली.

### चाकूचे सपासप वार

वैभव म्हात्रे आणि अंकित राणे यांनी विवेक राणे यांचा भाऊ धर्मेंद्र राणे (३२) याला पकडून ठेवले आणि आरोपी देवेंद्र म्हात्रे याने धर्मेंद्रच्या छातीमध्ये चाकू भोसकला. धर्मेंद्रला सोडवण्यासाठी विश्वास गेला असता आरोपी शुभम पाटील याने विश्वासला चाकूने भोसकले. त्यानंतर विवेक राणे यांना वैभव म्हात्रे याने पकडले आणि सिया म्हात्रे हिने त्याच्या कमरेवर सुरा चालवला. त्यावेळी विवेक यांची आई तिला पकडण्यासाठी आली असता पूनम म्हात्रे हिने विवेक राणे यांच्या आईच्या मानेवर सुरा मारून गंभीर दुखापत केली.

या हल्ल्यानंतर विवेक नंदकुमार राणे, विश्वास नंदकुमार राणे आणि करुणा नंदकुमार राणे यांना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले तर धर्मेंद्र राणे यांना मृत घोषित करण्यात आले. जखमी अवस्थेत विवेक राणे यांनी रुग्णालयातच मांडवा पोलिसांकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर मांडवा पोलिसांनी गुन्हा दाखल करुन देवेंद्र म्हात्रे, अंकित राणे, शुभम पाटील, वैभव म्हात्रे, पूनम देवेंद्र म्हात्रे यांना अटक केली तर सिया देवेंद्र म्हात्रे हिला शुक्रवार संध्याकाळपर्यंत अटक झालेली नव्हती. दरम्यान, जखमींवर उपचार सुरू आहेत, अशी माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक भोई यांनी दिली.

# द्यायचे होते १५००, खात्यातून गेले ९०,०००

**■मुंबई** : चष्मा न घालणे एका तरुणाला चांगलेच महागात पडले आहे. वांद्रे येथील रहिवासी अमूल्य शर्मा यांना एका रिक्षाचालकाने गंडवले. रिक्षाचे भाडे मोबाईलच्यामार्फत देतेवेळी अमूल्यच्या कमकुवत दृष्टी आणि विश्वासाचा फायदा घेत रिक्षाचालकाने त्यांच्या खात्यातून ९०,००० रुपये चोरले. या फसवणुकीच्या प्रकरणात वांद्रे पोलिसांनी रिक्षाचालक फुरकान शेखविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.




एफआयआरनुसार, मूळ हरियाणाचा रहिवासी असलेला अमूल्य शर्मा हा एका लॉ फर्ममध्ये काम करतो. आणि चष्म्याशिवाय वाचण्यात किंवा मोबाईल वापरण्यात त्याला अडचण येते. अलिकडेच त्याच्या मित्रांनी अंधेरीमध्ये एका पाटीर्चे आयोजन केले होते, जिथे तो चष्मा न घालता गेला होता. आणि याचवेळी त्याचा घात झाला. पार्टी संपल्यानंतर, अमूल्य पहाटे लवकर रिक्षाने वांद्रे येथील त्याच्या घरी निघाला. मुंबईत नवीन असल्याने, अमूल्यला मार्ग माहित नव्हते. याचा फायदा घेत रिक्षाचालक त्याला दुसऱ्या मार्गाने वांद्रे येथे घेऊन गेला. घरी पोहोचल्यावर ड्रायव्हरने १५०० रुपये भाडे मागितले. अमूल्यने त्याला फक्त ५०० रुपये दिले.

अमूल्य त्याचा चष्मा विसरल्यामुळे, त्याला रिक्षाच्या भाड्याची रक्कम दिसत नव्हती. सोबत रिक्षाचालकाचा मोबाईल नंबरही नीट टाइप करता येत नव्हता. अशा परिस्थितीत, रिक्षावाल्यावर विश्वास ठेवत त्यांनी त्यांचा मोबाईल फोन रिक्षाचालकाला दिला जेणेकरून रिक्षावाला स्वतः ऑनलाइन व्यवहार करून आपल्या भाड्याचे पैसे मिळवू शकेल. यावेळी, आरोपीने मोबाईलमध्ये दीड हजार रुपयांऐवजी ९० हजार रुपये टाकले आणि अमूल्यला ओटीपी विचारला.

**बँक स्टेटमेंट तपासल्यानंतर प्रकरण उघडकीस**

रक्कम न पाहता, अमूल्याने अंदाज लावला की भाडे भरण्यासाठी तोच ओटीपी मागितला गेला होता. त्याने ओटीपी सांगताच, फुरकान शेख नावाच्या व्यक्तीच्या खात्यात रक्कम ट्रान्सफर करण्यात आली. काही वेळाने, अमूल्यला संशय आला आणि जेव्हा त्याने बँक स्टेटमेंट तपासले तेव्हा त्याला धक्काच बसला. त्याला कळले की त्याच्या खात्यातून ९०,००० रुपये काढले गेले आहेत. त्यांनी लगेच वांद्रे पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. याप्रकरणी पोलिसांनी फुरकान शेखविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com